# यादवीच्या उंबरठ्यावर भाजप

- अनुष मालेकर



सलग दोन सार्वत्रिक निवडणुकांत अगदी अनपेक्षितपणे दणदणीत पराभवांना सामोरे जावे लागल्यामुळे सध्या भारतीय जनता पक्षाच्या भल्या-भल्या नेत्यांची स्थिती अक्षरशः 'गाढवही गेले अन् ब्रह्मचर्यही' अशी झाली आहे. खरे तर, या निराशाजनक पराभवांपासून काही बोध घेऊन ही मंडळी आत्मपरिक्षणास लागतील आणि आजवर झालेल्या चुका सुधारुन पक्ष फेरबांधणीच्या कामाकडे लक्ष देतील, अशी अपेक्षा होती. परंतु गेल्या दशकभरात आघाडी सरकारांच्या माध्यमातून का होईना, पण अनेक मोठमोठ्या सत्तापदांची चव चाखण्याची संधी मिळाल्यामुळे की काय आता त्यांना स्वार्थाखेरीज दुसरे काही सुचेनासेच झाले आहे, आणि त्यामुळे ताज्या पराभवाची कारणे शोधण्याऐवजी या पराभवाची जबाबदारी एकमेकांवर ढकलून पक्षयंत्रणेवरील आपली पकड टिकविण्यातच त्यांच्या साऱ्या शक्ती-बुद्धीचा व्यय होत असल्याचे पाहायला मिळत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून तयार झालेला आपला पक्ष संस्कारसंपन्न, शिस्तबद्ध कार्यकर्त्यांचा सुघड संच असल्याची शेखी मिरविणारे भाजपचे दुढ्ढाचार्य नेहमीच इतर राजकीय पक्षांपेक्षा आपण कोणीतरी खूप वेगळे आहोत असे भासवित असतात. परंतु गेल्या काही दिवसांपातील घडामोडी पाहिल्या तर 'पार्टी वुईथ ए डिफरन्स' ही या पक्षाची प्रतिमा म्हणजे चक्क बकवास आहे, अशाच निष्कर्षाप्रत यावे लागते. यावेळी प्रथमच भाजपने बुजुर्ग नेते अटलबिहारी वाजपेयी यांच्या अनुपस्थितीत निवडणूक लढविली आणि ती उणीव कमी म्हणून की काय, आपल्या प्रचारमोहिमेचा सारा भर पंतप्रधान डॉ. मनमनोहनसिंग यांच्या तथाकथित दुर्बल नेतृत्वाची टर उडविण्यावर ठेऊन स्वतःचे हसे करुन घेतले. खरे तर, अटलजींच्या खांद्याला खांदा लावून गेली तब्बल साठ वर्षे राष्ट्रीय राजकारणात वावरलेल्या लालकृष्ण अडवानींकडून त्यांच्या चाहत्यांच्याच नव्हे तर एकूण जनसामान्यांच्याही काही वेगळ्या अपेक्षा होत्या. हिंदुत्ववादाचा नारा देऊन १९९० च्या दशकात भाजप कार्यकर्त्यांमध्ये एक नवे स्फूर्तीचे वातावरण निर्माण करणारा हा अनुभवी व अभ्यासू नेता आता काही नवा विधायक कार्यक्रम घेऊन आपल्यासमोर येईल आणि मनमोहनसिंग सरकारच्या गेल्या पाच वर्षांतील कारभाराचा शास्त्रशुद्ध समाचार घेईल, असेच सारेजण मानत होते. परंतु प्रत्यक्षात घडले ते उलटेच ! २००४ च्या निवडणुकीस 'अँटी इनकम्बन्सी फॅक्टर'चा फटका जसा भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारला बसला तसा तो यावेळी काँग्रेसच्या नेतृत्वाखालील पुरोगामी लोकशाही आघाडी सरकारला बसेल आणि मग केंद्रात पुन्हा आपणच सत्तापदी येऊ याबद्दल अडवानी व त्यांचे सारे सहकारी इतके निःशंक होते की बस्स ! या फाजिल आत्मविश्वासापोटीच त्यांना बिजु जनता दलासारखे 'जुने मित्र' प्रचारमोहिम ऐन रंगात आली असतांना गमवावे लागले, परंतु त्यामुळे सावध होण्याऐवजी ही मंडळी अधिकच उधळली आणि एकीकडे 'मोदी ब्रँड' हिंदुत्ववादाचा उदोउदो (युवा नेता फिरोज वरूण गांधीची पिलभितमधील प्रक्षोभक-

> **सर्वोच्च नेते अडवानींचा अतिरेकी सत्तालोभ आणि पक्षाध्यक्ष राजनाथसिंह यांची बेजबाबदार दंडेली यामुळे सध्या भारतीय जनता पक्षाच्या 'हायकमांड' मधील मतभेद कळसास पोचले आहेत. तीच अवस्था महाराष्ट्र भाजपमधील हाय कमांड मध्येही आहे. खरे तर लागोपाठच्या दोन सार्वत्रिक निवडणुका गमावल्यानंतर भाजप नेते आत्मपरिक्षण करून एक दिलाने कामास लागतील आणि सत्तापदांचा हव्यास कमी करून जनसेवेच्या राजकारणाकडे वळतील, अशी अपेक्षा होती... परंतु तसे नजीकच्या काळात तरी घडण्याची शक्यता दिसत नाही.**

विषारी भाषणे ही त्याचीच परिणती होती) तर दुसरीकडे आजवरचे सर्वात दुबळे पंतप्रधान म्हणून डॉ. मनमोहनसिंग यांची थट्टा करण्यातच त्यांनी धन्यता मानली. मात्र भारतीय 'मतदार राजाला' गृहित धरून त्यांनी हा जो बालिश खेळ केला तो अखेर त्यांच्याच अंगाशी आला आणि भाजपचे लोकसभेतील संख्याबळ जेमतेम सव्वाशेवर आले. अर्थात या निवडणुकीत मतदारांनी केवळ जातीयवादी राजकारणावर भर देणाऱ्या भाजपलाच धडा शिकविला नाही तर केंद्र सरकार अस्थिर ठेवून स्वतःच्या तुंबड्या भरणारे फुटकळ प्रादेशिक पक्ष व डाव्यांनाही त्यांची योग्य जागा दाखविली. अनेकदृष्ट्या क्रांतीकारक आणि विधायक म्हणाव्या अशा या जनमत कौलाची दखल इतर संधीसाधू राजकारण्यांनी घेतली नाही तरी भाजपचे नेते मात्र जरुर घेतील आणि आपल्या पराभवास कारणीभूत ठरलेली 'रणनिती' आखणाऱ्या मंडळींचे महत्व उशीराने का होईना पण कमी करून पक्षाची विस्कटलेली घडी पुन्हा बसवतील असे वाटत होते. परंतु गटबाजीची लागण झालेला हा पक्ष आता या धक्क्यातून नजिकच्या भवितव्यात तरी सावरण्याची फारशी शक्यता दिसत नाही. अटलजींच्या राजकीय अस्तानंतर गेल्या पाच वर्षात जनहिताचे राजकारण सोडाच पण पक्षीय हितसंबंधांचीही जपणूक अजिबात करू न शकलेल्या अडवानींनी



खरे तर फार पूर्वीच नेतेपद सोडून 'सांगेन गोष्टी युक्तीच्या चार' म्हणत नव्या पिढीच्या मार्गदर्शकाची भूमिका स्विकारायला हवी होती. ताज्या निवडणूक निकालानंतर त्यांनी तशी तयारी जरुर दर्शविली, परंतु त्यात ठामपणा नव्हता. आपल्या माघारी भाजपच्या नेतेपदासाठी आणि खरे तर लोकसभेतील विरोधीपक्षनेतेपदासाठी ज्यास कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा आहे... पक्षाच्या जुन्या-नव्या नेत्यांमध्ये सुंदोपसुंदी माजेल, याचा अंदाज असल्याने किंचित आग्रह होताच त्यांनी आणखी काही काळ तरी हे पद स्वतःकडेच ठेवण्याचा एकतर्फी निर्णय घेतला. विशेष म्हणजे त्यांचा हा निर्णय त्यांचे ज्येष्ठ सहकारी डॉ. मुरली मनोहर जोशी, जसवंतसिंग व यशवंत सिन्हा यांना अजिबात मान्य नव्हता. परंतु त्यांच्या नाराजीकडे दुर्लक्ष करून पक्षाध्यक्ष राजनाथसिंह यांच्या मदतीने अडवानींनी लोकसभेतील उपनेतेपदी श्रीमती सुषमा स्वराज व राज्यसभेतील नेतेपदी अरुण जेटली यांची नियुक्तीही जाहीर केली. त्यापैकी जेटली हे ख्यातनाम कायदेपंडीत व मिडीया सेन्ही म्हणावे असे तडफदार राजकारणी आहेत यात शंकाच नाही. पण नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपचे व्यूहरचनाकार व प्रचार यंत्रणा प्रमुख म्हणून त्यांनी जी भूमिका बजावली, त्यातच पक्षाच्या दारुण अपयशाची बीजे दडलेली होती. हेही दुर्लक्षून चालणार नाही. या अपराधाबद्दल काही शासन केले जाण्याऐवजी त्यांना राज्यसभेतील नेतेपदाचे पारितोषिक दिले गेले, ही गोष्ट अडवानीसमर्थक वगळता कोणालाच पटणे शक्य नव्हते. जी गोष्ट जेटलींची तीच सुषमा स्वराज यांची. त्या पक्षाच्या आघाडीच्या महिला नेत्र्या आहेत आणि आजवर आपल्यावर सोपविली गेलेली प्रत्येक जबाबदारी त्यांनी अत्यंत कार्यक्षमतेने हाताळली आहे, हे कोणीच नाकारत नाही परंतु जेन नेक्स्ट कडे नेतृत्वाची धुरा सोपवितांना अन्य दिग्गज नेते डावलले व दुखावले



जाणार नाहीत यांची दक्षता अडवानी-राजनाथसिंह यांनी घेणे अत्यंत गरजेचे होते. ते न झाल्यामुळे संतापलेल्या जसवंतसिंह यांनी काही दिवसांपूर्वी पक्षकार्यकारिणीच्या बैठकीतच आपल्या असंतोषाला वाचा फोडली आणि 'अडवानींचा' वारसदार लादला जाऊ नये तर सर्वसहमतीने ठरविला जावा असे स्पष्टपणे बजावले. विशेष म्हणजे कारभार एकतंत्री व हुकुमशाही पद्धतीने होत आहे, '' असे सुचित करून ते थांबले नाहीत तर 'निवडणुकीतील पराभवास नेमके जबाबदार कोण आहेत, याची पडताळणी केली जावी आणि हिंदुत्वाच्या मुद्यासंबंधातील संदिग्धता दूर करून पक्षाने चालू काळास सुसंगत भूमिका स्विकारावी,'' अशा दोन प्रमुख मागण्याही त्यांनी केल्या. जसवंतसिंह यांच्या या भूमिकेस अरुण शौरी व यशवंत सिन्हा या 'जेन नेक्स्ट'च्या म्हणता येतील अशा अन्य बड्या नेत्यांचाही पाठिंबा असून, आपल्या मागण्यांची तड लावण्यासाठी सिन्हा यांनी नुकताच पक्षाच्या उपाध्यक्षपदाचा राजीनामाही दिला आहे. खरे तर, हा राजीनामा स्विकारण्यापूर्वी अध्यक्ष राजनाथसिंह यांनी सिन्हा यांचे म्हणजे समजावून घेणे व त्यांची समजूत घालणे आवश्यक होते, परंतु पक्षशिस्तीचा बडगा उगारुन त्यांनी सिन्हांचा पत्ता काटण्याची संधी साधली. अनावश्यक घाईगर्दीने त्यांनी केलेल्या या कारवाईला अडवानींचा आशीर्वाद असणार, हे तर उघडच आहे, पण त्यामुळे पक्षातील बंडखोरांचा आवाज मात्र ते कदापी दडपू शकणार नाहीत. आज या बंडखोरीने व असंतोषाने एवढे उग्र रूप धारण केले आहे की खुद्द सुषमा स्वराज यांना त्याचे वर्णन 'व्होल्कॅनिक' (असंतोषाचा ज्वालामुखी) अशा शब्दात करावे लागत आहे. तो शमविण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय कार्यकारिणीतर्फे काही पावले तातडीने टाकली जातील, अशी सर्वसाधारण अपेक्षा होती. पण ती मात्र फोल ठरली आहे. ''निवडणुकीतील पराभव ही कोणा एका व्यक्तीची नव्हे तर सामुहिक जबाबदारी आहे अशी मखलाशी करुन आणि हिंदुत्वाच्या भूमिकेशी वचनबद्ध असल्याची औपचारिक ग्वाही देऊन अडवानी व त्यांच्या समर्थक चेल्यांनी आणखी काही काळ तरी पक्षाचे सर्वाधिकार स्वतःकडेच राखले आहेत. त्यांच्या या मतलबी वर्तनावर टीप्पणी करतांना भाजपच्याच एका नेत्याने पक्ष आणि पक्षनेतृत्व यांच्यादरम्यान आता काही संबंधच उरलेला नसल्याची जी भावना बोलून दाखविली ती खूप काही सांगून जाणारी आहे. अर्थात खुद्द अडवानींना मात्र त्याची फारशी पर्वा नाही, असे दिसते. कारण आता पक्षकार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्यासाठी पुन्हा एकवार भारतयात्रा करण्याचा संकल्प त्यांनी जाहीर केला आहे. त्यांचा हा संकल्प म्हणजे एका अर्थाने सत्तातुराणां न भयं न लज्जा या उक्तीचा धक्कादायक प्रत्ययच मानावा लागेल. अवघे पाऊणशे वयोमान केव्हाच पार केलेला हा नेता पंतप्रधानपदाचे स्वप्न भंग पावल्यावर तरी ताळ्यावर येईल आणि लोकप्रियता घसरणीस लागलेल्या आपल्या यादवीग्रस्त पक्षाची सुत्रे तरूण पिढीच्या हाती सोपवून निवृत्तीचा राजमार्ग स्विकारेल अशी अपेक्षा होती, परंतु आता ती नजिकच्या काळात तरी पूर्ण होण्याची शक्यता दिसत नाही. अर्थात काळाची पावले ओळखून ते निवृत्त झाले नाहीत वा सर्वदृष्ट्या सुमार वकुबाच्या राजनाथसिंहांनी ही पक्षाध्यक्षपदावरील पकड सोडली नाही तर त्यामुळे अहित होणार आहे हे अन्य कोणाचे नाही तर भाजपचेच ! जेमतेम दशकभरापूर्वी हा पक्ष धार्मिक, भावनात्मक मुद्यांची लाट निर्माण करुन का होईना पण राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आला होता आणि काँग्रेसच्या एकाधिकारशाहीला पर्याय ठरला होता, परंतु आता मात्र त्याच त्या जुनाट कार्यक्रमांना व कर्मठ नेतृत्वास चिकटून राहिल्यामुळे त्याचे गाडे निश्चितच रुळावरुन घसरले आहे. एकीकडे पक्षश्रेष्ठींमधील मतभेदांची रुंदावलेली दरी आणि दुसरीकडे राज्या-राज्यातील नेत्यांमध्येही माजलेले तंटे-बखेडे यामुळे आज सच्चा, प्रामाणिक भाजप कार्यकर्त्यांची स्थिती तरी 'इकडे आड तर तिकडे विहीर' अशी झाली आहे. ती बदलण्यासाठी वेळीच पावले उचलली गेली नाहीत तर कदाचित महाराष्ट्रात मुंडे-गडकरी, राजस्थानात वसुंधरा राजे-चौहान, गुजराथमध्ये मोदी-केशुभाई पटेल आणि दिल्ली-उ.प्रदेशात अडवानी-राजनाथसिंह यांच्या सुभेदाऱ्या कायम राहातील पण सध्याचे 'एक प्रमुख राष्ट्रीय पक्ष' हे स्थान मात्र भाजपला निश्चितपणे गमवावे लागेल. त्याची जाणीव असल्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नूतन सरसंचालक मोहनराव भागवत यांनी या प्रश्नात लक्ष घातले असून, अडवानी आदि मंडळींना भाजपचे नेतृत्व सोडण्याचे संकेत दिले आहेत, असे सांगितले जाते. त्यात कितपत तथ्य आहे हे समजण्यास मार्ग नाही कारण भाजप व संघाचे नेते तोंडाने लोकशाहीमूल्ये, पारदर्शी प्रामाणिकता व राष्ट्रधर्माच्या गोष्टी बोलत असले तरी त्यांची एकंदर कार्यपद्धती मात्र एकचालकानुवर्ती आणि 'आम्ही सांगू ते धोरण व बांधू ते तोरण'अशी असते असाच आजवरचा अनुभव आहे.. आणि अडवानींचा आडमुठेपणा पाहाता हे चित्र यापुढेही बदलण्याची शक्यता नाही. अर्थात ते अमुलाग्रपणे बदलले तरच भाजपला काही भवितव्य राहील, याबद्दल आमच्या मनात तरी तीळमात्र शंका नाही.

■■■

# महिलांना अधिकाधिक तिकिटे

**– छगन भुजबळ**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राज्यव्यापी महिला चिंतन शिबीर ३१ जुलै, २००९ रोजी मुंबईतील पाटकर हॉलमध्ये संपन्न झाले. त्या शिबिराचा हा संक्षिप्त वृत्तांत.



“लोकांना काम करणारा, त्यांच्यासाठी लढणारा, अन्यायाविरुद्ध टक्कर देऊन आंदोलने करणारा नेता आवडतो. अनेक महिला आरक्षण नसतानाही स्वतःच्या ताकदीवर निवडून आल्या. शेवटच्या माणसांपर्यंत पोहोचण्याचे काम महिला जेवढे करू शकतात तेवढे कुणीही करू शकत नाही हे मी स्वतः निवडणुकीत अनुभवलेले आहे. झोकून देऊन काम करण्याची उर्मीच शेवटीच विजयी रथावर नेते. महिलांचे पक्ष संघटनेतील योगदान लक्षात घेऊन त्यांना अधिकाधिक तिकिटे दिली पाहिजेत” असे राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी सांगितले.

मुंबईतील एसएनडीटी विद्यापीठाच्या पाटकर हॉलमध्ये ३१ जुलै रोजी राज्यव्यापी महिला चिंतन शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्याच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे पदावरून श्री. भुजबळ बोलत होते. शिबिराच्या अध्यक्षस्थानी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आर. आर. पाटील हे होते.

श्री. भुजबळ पुढे म्हणाले, “निवडणूक आपण कशी जिंकणार आहोत याच विषयावर आता कार्यकर्त्यांनी चिंतन करण्याची आवश्यकता आहे. केंद्र व राज्य सरकारने जेवढे काम गेल्या पाच वर्षांत सामान्य माणसांसाठी केले तेवढे काम आजपर्यंत कधीही झालेले नाही. ग्रामीण भागात शेती मंत्रालयाने व शहरात नगर विकास विभागाच्या जेएनयुआरएम योजनेने जे प्रचंड काम केले, त्यामुळे चेहरामोहरा बदलण्यास मदत झाली आहे. आपल्या राज्याचे जलसंपदा मंत्री अजित पवार यांनी विदर्भ आणि मराठवाड्याचे पाण्याचे प्रश्न सोडविण्याचे मोठे काम केले आहे. त्यासाठी यावर्षीच्या अर्थसंकल्पात ७ हजार कोटी रुपयांची तरतूद केवळ सिंचनासाठी करण्यात आलेली आहे. ही सगळी कामे आपल्या सरकारने केली पण ती ‘कॅश’ कशी करायची याबाबत आपण अजून फारसा विचार केलेला दिसत नाही. आपल्या राष्ट्रवादीच्या मंत्र्यांनी तर जेवढे काम केले तेवढे काँग्रेसच्या मंत्र्यांनीदेखील केलेले नाही. तरीदेखील मागच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला जेवढा फायदा झाला तेवढा या कामांचा फायदा आपल्याला मिळाला नाही. याचे गुपीत काय आहे? हे कधीतरी तपासले पाहिजे. प्रत्येक मतदारसंघात निश्चित काही प्रश्न असतील. काँग्रेसचे १७ लोक निवडून आले, त्यातील अनेकांची नावेही कुणाला माहिती नाहीत पण आमचे मात्र खंदे नेते का पडले? याचा कधीतरी अंतर्मुख होऊन शोध घेतला पाहिजे. लोकसभा निवडणुकीत आपल्याला जी नामुष्की आली ती भरून काढण्यासाठी आपसातले सर्व मतभेद गाडून टाकू ही प्रतिज्ञा करूनच आपण निवडणुकीला सामोरे गेले पाहिजे. गरीब, दलित, शेतकरी, अल्पसंख्यांक यांच्या विकासाबाबतीत आपला पक्ष सातत्याने विचार करून निरनिराळ्या योजना राबवित आला आहे. मात्र,



मुलींना शिक्षण द्यावयाचे नाही याबाबतची कोती मनस्थिती व पुराणमतवादी मानसिकता स्त्री आणि पुरुष या दोघांमध्येही बऱ्याचदा दिसून येते. ती बदलली पाहिजे. मुलींना शिकविले पाहिजे. महिलांनीदेखील अन्याय झाला तर त्याविरुद्ध झेंडा हातात घेऊन उठलं पाहिजे. अन्यायाविरुद्ध महिला प्रखरपणे लढतात, हे चित्र त्या उभ्या करू शकल्या तर त्यांचा नावलौकिक व कामाचा बोलबाला सर्वत्र झाल्याशिवाय राहणार नाही. मग आमचेही त्यांना तिकीट देण्याचे काम सोपे होईल. निव्वळ ५० टक्के तिकिटे महिलांना दिली पाहिजेत असे नुसते म्हणून भागणार नाही. तिकीट देत असताना राज्याची सत्ता पुन्हा ताब्यात येते की नाही हेही पाहिले पाहिजे. त्यामुळे निवडून येऊ शकणाऱ्या महिलांना प्राधान्याने तिकीट दिले पाहिजे. अनेक महिला आम्हाला नेहमी असे म्हणतात की, पक्षाच्या कार्यालयात आम्हाला सगळे ओळखतात. पक्ष कार्यालयात ओळखण्यापेक्षा शेजारी ओळखतात की नाही हे जास्त महत्त्वाचे आहे. पक्षाच्या ऑफीसमध्ये तुम्हाला कुणी ओळखो न ओळखो पण तुमचे काम असेल आणि लोक तुम्हाला मोठ्या संख्येने ओळखत असतील तर त्याचे माप तुमच्या पदरात निश्चित पडेल.''

यावेळी झालेली प्रमुख महिला कार्यकर्त्यांची भाषणे पुढीलप्रमाणे :

## सुरेखाताई ठाकरे, महिला प्रदेशाध्यक्षा :

स्त्री शक्तीने भेदू लक्ष विधानसभेचे
आता एकच लक्ष...! २००९ विधानसभेचे.

हे घोषवाक्य घेऊनच आम्ही निवडणुकीसाठी आता सज्ज झालेलो आहोत. यावेळी महिलांना ३३ टक्के जागा दिल्या पाहिजेत. मागच्या वेळेला फक्त पाच महिलांना तिकिटे दिली होती. त्या सगळ्या निवडून आल्या. संघर्ष करीत करीत जी महिला पुढे जाते तिला संधी दिली पाहिजे. मतदारसंघात उमेदवारी देताना आमचा निश्चित विचार होऊन सन्मान राखला गेला पाहिजे. महिलांना उमेदवारी देण्यासाठी काँग्रेसकडून काही मतदारसंघ सोडवून घ्यावे लागणार आहेत.

*महिला चिंतन शिबिराचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना छगन भुजबळ, आर. आर. पाटील, शेजारी निवेदिता माने, अल्पना पेंटर, सुरेखा ठाकरे, वंदना चकरे, अरुण गुजराथी, हबीब फकीह, रमेश शेंडगे व इतर मान्यवर.*



## अल्पना पेंटर, मुंबई अध्यक्षा :

मुंबई एक छोटा हिंदुस्थान आहे. मुंबईच्या विकासासाठी देखील राज्य सरकारने पॅकेज तयार केले पाहिजे. आता मुंबईला खूप गलिच्छ व वाईट स्वरूप येत आहे. मुंबईत सहा जिल्हे असून, प्रत्येक जिल्ह्यातून दोन या प्रमाणे बारा तिकिटे राष्ट्रवादीने मागावीत व त्यातील चार जागा महिलांना मिळाव्यात अशी आमची मागणी आहे. अपयशी पुरुषांना पुन्हा पुन्हा तिकिटे देता मग महिलांना संधी द्यायला काय हरकत आहे. महिला बचत गट हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी जोडले गेले पाहिजेत. तसे केले तर पक्षाची ताकद वाढू शकेल.

## उषा दराडे, आमदार :

येणारा मुख्यमंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचाच असेल या दृष्टीने आपण निवडणुकांची तयारी करून जास्तीत जास्त आमदार आपल्या पक्षाचे निवडून आणले पाहिजेत. महिलांचे सक्षमीकरण झाले तरच देश सबल होईल. अनेक आमदारांचा विरोध असतानाही पंचायत राज्यात ३३ टक्के आरक्षण पवारसाहेबांनी महिलांसाठी दिले. परिवर्तनाची चळवळ अनेक मार्गांनी पुढे जात असते. कार्यकर्त्यांमध्ये विनयशीलता व कृतीशीलता असली पाहिजे. पक्षात स्वतःची जागा स्वतः निर्माण केली पाहिजे. पक्ष वाढविण्याचा, तो लोकांपर्यंत नेण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. लोकसभा निवडणुकीच्या निकालात आपण मागे पडलो आहोत ही उणीव भरून काढायची असल्याने आपली पंढरी ही येणारी विधानसभा आहे हे समजून सगळ्या महिलांनी कामाला लागावे.

## वर्षा निकम, मुंबई :

निवेदिताताई गोड बोलायचे का कसे? चिंतन शिबीर आहे. खरे बोलले आणि मनन केले तरच अमृत बाहेर येऊ शकेल. आजपर्यंत गोड बोलून बोलून आम्ही थकलो. आता कोणत्याही दगडाला शेंदूर लावायला लावू नका. चांगल्या माणसांच्याच पाठिशी आम्ही उभे राहू. आम्ही काम करीत राहू. पण त्याची दखल तुम्ही घ्या. किती दिवस आमचे कंपोस्ट खत करणार आहात? महिला आयोग, महामंडळे या ठिकाणी आम्हा महिला कार्यकर्त्यांना पाहिजे तेवढी संधी मिळालेली नाही. पुरुषांसारखी पदांसाठीची स्पर्धा आमच्यात नाहीत. मात्र



*चिंतन शिबिराला राज्यातून झालेली महिला कार्यकर्त्यांची गर्दी.*




महिलांना काम केले तर पद मिळू शकतात असा विश्वास वाटला पाहिजे. आता आम्हाला भिती वाटू लागली आहे की, उद्या महिलांसाठी आरक्षण जाहीर झाले तर नेत्यांच्याच बायका घराबाहेर येतील की काय? म्हणजे आम्ही पक्षात काम करणाऱ्या कार्यकर्त्या घरी आणि आजपर्यंत ज्या घराच्या बाहेर कधी पडल्या नाहीत त्या नेत्यांच्या बायका बाहेर, पदांवर. असले चित्र बघायला मिळू नये अशी अपेक्षा आहे.

## ॲड. सुनीताताई जगताप :

पक्षासाठी काबाडकष्ट केलेल्या जुन्या महिला गेल्या कुठे? त्या आज दिसत नाहीत. सत्तेत वाटा देण्याची वेळ येते तेव्हा महिलांना डावलण्यात येते. राज्यसभेत एक जागा महिलांना का दिली नाही? सकारात्मक विचार करा, हे बोलणे सोपे असते. तन मन धनाने आम्ही महाराष्ट्र पिंजून काढला. आम्हाला काय मिळाले? विधान परिषदेची संधी महिलांना दिली जात नाही. पुरुष आणि महिला यांना कायद्याने समान अधिकार दिला असताना आम्ही ३३ टक्केच आरक्षण मागतो आणि तेही आम्हाला मिळत नाही ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मुख्यमंत्री महिला असेल असे जाहीरनाम्यात नमूद करा. मग बघा काय चमत्कार होतो तो. आता महिलांचे राज्य येणार आहे असे म्हटल्यावर सगळेजण गप्प बसतील. आई आणि बाबा म्हणजे आबा. आबा (आर. आर. पाटील) तुम्हाला दोघांची भूमिका बजवायची आहे. मागच्या लोकसभेपासून आपण काही शिकणार आहोत की नाही? ठराविक लोकांचा विचार किती दिवस करून आमच्यावर अन्याय करणार आहात? ये राष्ट्रवादी की नारी है । फूल नहीं चिनगारी हैं ।।

## राजश्री बोरकर, पुणे :

महिला आरक्षणाबाबत पक्षाने मोठेपणा दाखवावा. पुणे जिल्ह्यात आम्ही पाच जागा मागितल्या तर आमच्या अनुपस्थितीत आमचा निषेध करण्यात आला. कुणीतरी चार टाळकी जमतात आणि आमचा निषेध करतात या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. आमची भगिनींची शक्ती खूप मोठी आहे. पण त्या प्रमाणात आम्हाला न्याय्य मिळत नाही. पवारसाहेब आणि आबा यांची विचार करण्याची पद्धत चांगली उदात्त आहे. पण तशी बुद्धी इतरांना का लाभत नाही?

## खासदार सुप्रिया सुळे

केवळ आरक्षणावर अवलंबून न राहता महिला कार्यकर्त्यांनी तळागाळात काम करून जनतेच्या प्रश्नांसाठी लढून स्वतःची प्रतिमा आणि स्थान अशा पद्धतीने निर्माण करावे की, उमेदवारीचा विचार करताना पक्षाला त्यांना डावलताच येणार नाही. महिला बचत गटांच्या माध्यमातून आज स्त्रियांची शक्ती खूप मोठ्या प्रमाणावर सर्वत्र उभी राहात आहे. एकूण मतदारात पन्नास टक्के मतदार या महिला आहेत. महिलांचे मतदानातले हे संख्याबळ लक्षात घेऊन त्यांना इतक्या प्रमाणात संधी पक्षानेही उपलब्ध करून दिली पाहिजे. सातारा जिल्हा




मध्यवर्ती सहकारी बँकेने यावर्षी १४ कोटी रुपये नफा झाल्यामुळे श्री. शरद पवारसाहेबांच्या सूचनेवरून महिला बचत गटांना बिनव्याजी कर्ज देण्याचे धोरण स्वीकारलेले आहे. असेच धोरण आता श्री. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करीत असलेली पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकही स्वीकारणार आहे. पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेला यावर्षी जवळपास २२ कोटीहून अधिक नफा झाला असून या नफ्यातला काही वाटा बिनव्याजी कर्जाच्या रुपाने महिला बचत गटांना देण्याचा निर्णय बँकेने घेतलेला आहे. याबद्दल सातारा आणि पुणे या दोन्ही जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाचे मी मनापासून आभार मानते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ताब्यात असलेल्या सर्व जिल्हा मध्यवर्ती बँकांनीही अशाच प्रकारे महिला बचत गटांना बिनव्याजी कर्ज देण्याची भूमिका घ्यावी अशी आमची आग्रही मागणी आहे.

## आर. आर. पाटील, प्रदेशाध्यक्ष :

लोकसभा निवडणुकीमध्ये आपल्या पक्षाला मनासारखे यश मिळालेले नाही. ही सल आपल्या मनात आता कायम आहे. ती भरून काढायची असेल तर विधानसभा निवडणुकीला आपण एकजुटीने सर्व राजकीय व आपापसातील मतभेद विसरून आणि मानमरातब वगळून सामोरे गेले पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेस हा राज्यातला क्रमांक एकचा पक्ष असून आपली ताकद सर्व क्षेत्रात खूप मोठी आहे. तिचा पुरेपूर वापर या निवडणुकीत करण्याच्या दृष्टीने सर्व कार्यकर्त्यांनी कंबर कसण्याची आवश्यकता आहे. महिलांना राजकारणात जास्त संधी दिली पाहिजे अशी भूमिका शरद पवारसाहेबांनी सुरुवातीपासूनच स्वीकारून आपल्या पक्षाचे ते धोरण म्हणूनच राबविलेले आहे. महिलांच्या संबंधी साहेबांनी जो उदार व विशाल दृष्टीकोन दाखविला तो अन्य कुणीही दाखवू शकलेले नाही. हे लोकसभेतील महिला आरक्षणाचे बिल संमत होत नसल्यावरून आपल्या लक्षात आले असेल. पण आपण सुरुवातीपासून या बिलाला एक राजकीय पक्ष म्हणून पाठिंबा देऊ, त्याचा सातत्याने पाठपुरावा केलेला आहे. येत्या विधानसभा निवडणुकीतही महिलांना ३३ टक्के जागा निश्चित पणाने दिल्या जातील, अशी ग्वाही मी या वेळी आवर्जुन देतो.

यावेळी प्रमिला येणारे, कौसर परवीन फारुकी, वैशाली गुंड, लिलाताई जाधव, सुषमा कश्यप, डॉ. मुक्ता सय्यद, जयश्रीताई अहिरराव, सुधाताई साबळे, शंकुतला कदम, कल्पना बुरंगे, कल्पना नागवडे, वंदना चकरे, विजया दहिफळे, संजीवनी सिसोदे, आशा भिसे, डॉ. भारती लव्हेकर, सुनीता शिंदे व अन्य महिलांची भाषणे झाली. चंदाताई जगदीश तिवाडी यांनी राष्ट्रवादीचे घड्याळ घूमूया, या ग सयांनो या । हे स्वागतगीत सादर केले. पूर्णिमा शिंदे यांनी शिबिराचे सूत्रसंचालन केले. महिला राष्ट्रवादीच्या देशाच्या अध्यक्षा श्रीमती निवेदिता माने यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला सुरुवातीला पुष्पहार अर्पण केला.

चिंतन शिबिराला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस गोविंदराव आदिक, अल्पसंख्यांक विभागाचे अध्यक्ष हबीब फकीह, माजी प्रदेशाध्यक्ष अरुणभाई गुजराथी, कोषाध्यक्ष आमदार हेमंत टकले, चिटणीस दिनकर तावडे व सेवादलाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

■■■

# परराष्ट्र धोरणावरून विरोधकांचा हल्लाबोल



**- विजय नाईक,**

**नवी दिल्ली**



संयुक्त पुरोगामी सरकारच्या दुसऱ्या फेरीत दोन्ही बाजूंचे खेळाडू तेच आहेत. पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग व विरोधी पक्षनेते लालकृष्ण अडवानी. त्याची पदे गेल्या सहा वर्षात बदलली नाही. घटकपक्ष व बाहेरून पाठिंबा देणाऱ्या काही राजकीय पक्षांमुळे सरकारच्या स्थिरतेला धोका नाही. सरकार चालविताना विरोधकांची प्रहारक्षमता वाढू नये, याची काळजी सत्तारूढ पक्षाला घ्यावयाची असते. उलट, सरकारला पदोपदी कचाट्यात कसे पकडायचे, याची रणनीति विरोधक आखीत असतात. संसदीय लोकशाहीचे हे वैशिष्ठ्य ध्यानात घेतले, की सकारात्मक सहकार्य व सहमती हे शब्द वारंवार इतिहासजमा होताना दिसतात, ते संसदपटलावर व संसदेबाहेर चाललेल्या राजकारणातही. १५ व्या लोकसभेच्या निवडणुकीत मतदाराने काँग्रेसला सढळ हाताने पाठिंबा देऊन केंद्रस्थानी आरूढ केले. त्यावेळी जनतेच्या आकांक्षाही उंचावल्या. त्यांची पूर्ती करण्यासाठी पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांना जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील. जनतेचा कायमचा पाठिंबा गृहीत धरता येणार नाही.

अर्थमंत्री प्रणव मुकर्जी यांनी सादर केलेल्या २००९-२०१० च्या अर्थसंकल्पामुळे 'आम आदमी फारसा खूष झाल्याचे दिसत नाही. चलनवाढीचे प्रमाण शून्याखाली जाऊनही जीवनावश्यक वस्तूंच्या किमती भरमसाठ वाढल्याने त्याच्यावर आधीच असलेल्या बोजात भर पडलीय. मान्सूनने यंदा लपंडाव केल्याने पुढील वर्षीच्या धान्योत्पादनावरील प्रश्नचिन्ह कायम आहे. अंतर्गत सुरक्षाविषयक चित्र सर्वसाधारणतः चिंताजनक नसले, तरी नक्षलवादी, माओवादी यांच्या हिंसाचाराचे आव्हान दिवसेंदिवस गंभीर बनते आहे. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर त्या प्रकारचा हल्ला झाला नाही, हे सुदैव. २९ जुलै रोजी लोकसभेत बोलताना डॉ सिंग म्हणाले, ''त्या प्रकारचा हल्ला पुन्हा झाल्यास दुतर्फा संबंधांत सहन न होणारा कमालीचा तणाव निर्माण होईल, त्याची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी सारे उपाय करण्यात आले पाहिजे, असे मी पाकिस्तानचे पंतप्रधान युसूफ रझा गिलानी यांना शर्म अल शेख येथे सांगितले.'' ते म्हणाले, की पाकिस्तानने पश्चिम सीमेवर (स्वात) दहशतवाद्यांविरूद्ध (तालिबान) लष्करी कारवाई करण्याचा जो निर्धार दाखविला, तसाच निर्धार पूर्व सीमेवरील दहशतवाद्यांबाबत दाखविला पाहिजे. ''पाकिस्तानच दहशतवाचा बळी ठरलाय,'' असा युक्तीवाद करणे योग्य नाही, असेही गिलानी यांना सुनावल्याचे डॉ.सिंग यांनी लोकसभेत सांगितले.

'चोराच्या उलट्या' अशी पाकिस्तानची वृत्ती आहे. एकीकडे लष्कर-ए-तैय्यबा व जामत-उद-दवा या संघटनांना भारताविरूद्ध दहशवादी कारवाया करण्यास सशस्त्र प्रोत्साहन द्यायचे, व दुसरीकडे आपणच दहशतवादाचे बळी ठरलोय, अशी बोंब ठोकायची. हे सूत्र आता पाकिस्तानतर्फे वारंवार

> **'चोराच्या उलट्या' अशी पाकिस्तानची वृत्ती आहे. एकीकडे लष्कर-ए-तैय्यबा व जामत-उद-दवा या संघटनांना भारताविरूद्ध दहशवादी कारवाया करण्यास सशस्त्र प्रोत्साहन द्यायचे, व दुसरीकडे आपणच दहशतवादाचे बळी ठरलोय, अशी बोंब ठोकायची. हे सूत्र आता पाकिस्तानतर्फे वारंवार वापरले जाऊ लागले आहे. कारगिलच्या युद्धात ठार झालेल्या पाकिस्तानी जवानाना ओळखण्यास व त्यांचे मृतदेह परत घेण्यास पाकिस्तानने नकार दिला होता. जो देश स्वतःच्या नागरिकांना ओळखण्याचे नाकारतो, त्याची मानसिक विकृती किती शिगेला पाहोचली आहे, याची कल्पना येते. परंतु, ''काही झाले तरी पाकिस्तान आपला शेजारी आहे, ही वस्तुस्थिती आपण नजरेआड करू शकत नाही.**

वापरले जाऊ लागले आहे. कारगिलच्या युद्धात ठार झालेल्या पाकिस्तानी जवानांना ओळखण्यास व त्यांचे मृतदेह परत घेण्यास पाकिस्तानने नकार दिला होता. जो देश स्वतःच्या नागरिकांना ओळखण्याचे नाकारतो, त्याची मानसिक विकृती किती शिगेला पाहोचली आहे, याची कल्पना येते. परंतु, ''काही झाले तरी पाकिस्तान आपला शेजारी आहे, ही वस्तुस्थिती आपण नजरेआड करू शकत नाही,'' असे डॉ सिंग म्हणाले. ते सत्य आहेच. परंतु प्रश्न आहे, तो पाकिस्तानबरोबर बोलणी करताना अधुनमधून कठोर भाषा वापरूनही आपण नेहमी नमते का घेतो, हा. शर्म अल शेख येथे डॉ सिंग व पाकिस्तानचे पंतप्रधान युसूम रझा गिलानी यांच्या भेटी नंतर जारी करण्यात आलेल्या निवेदनातील बलुचिस्तानच्या उल्लेखावरून जे वादळ घोंघावते आहे, त्यावर बोलताना जनता दल (संयुक्त) चे अध्यक्ष शरद यादव यांनी मर्मावर बोट ठेवीत विचारले, की युद्धात आपण जिंकतो व चर्चेत पराभूत होतो, असे का होते? या प्रश्नाचे सरकारकडे काही उत्तर नव्हते.

शर्म अल शेखमधील संयुक्त निवेदन हे दोन्ही नेत्यांच्या सुमारे दोन तास चाललेल्या चर्चेनंतर करण्यात आले. याचा अर्थ, केवळ चर्चेत मान्य झालेल्या मुद्द्यांचा उल्लेख त्यात होता. बलुचिस्तानमधील भारताच्या हस्तक्षेपाचा मुद्दा नमूद करण्याचे पंतप्रधानांनी मान्य केलेच कसे? तसेच, वाटाघाटींची प्रक्रिया दहशतवादी कारवायापासून अलग करण्याच्या मुद्याचा समावेश का करण्यात आला, या दोन्ही प्रश्नांवर संसदेत तुंबळ चर्चा होऊनही पंतप्रधान सिंग व प्रणव मुकर्जी विरोधकांचे समाधान करू शकले नाही. पंतप्रधानांचे स्पष्टीकरण असे,''पाकिस्तानप्रणित दहशतवादाबाबत मी गिलानी यांच्याबरोबर बोललो, तेव्हा ते म्हणाले, पाकिस्तानातील अनेक लोकांना वाटते, की भारत बलुचिस्तानमध्ये लुडबूड करीत आहे. त्यावर मी सांगितले, की पाकिस्तानला अस्थिर करण्यात भारताला काही स्वारस्य नाही, तशी कोणतीही वैरत्वाची भावना नाही. पाकिस्तान एक शांततामय, स्थिर व वैभवशाली राष्ट्र असावे, कारण तेच त्याच्या हिताचे आहे असे मला वाटते. दोन्ही देशांना चिंता वाटणाऱ्या कोणत्याही विषयावर चर्चा करण्यास भारत कचरणार नाही.'' तसेच ''अफगाणिस्तानातील भारतीय दूतावास कोणत्याही पाकिस्तानविरोधी कारवायात गुंतलेला नाही, असेही मी सांगितले,'' असे डॉ सिंग म्हणाले. प्रश्न आहे, तो बलुचिस्तानच्या मुद्याच्या संयुक्त निवेदनातील उल्लेखाचा. पंतप्रधानांनी चर्चेदरम्यान त्याला उत्तर दिले, तथापि संयुक्त निवेदनात ते का समाविष्ट करण्यात आले नाही? याबाबत कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण डॉ सिंग देऊ शकते नाही. मुकर्जी यांनीही कबूली दिली, की मुद्याचा उल्लेख एकतर्फी झाला. परराष्ट्र मंत्री एस.एम.कृष्णा म्हणाले, की आमच्याकडे



*भारताचे पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग आणि पाकिस्तानचे पंतप्रधान युसूफ रझा गिलानी यांच्यात शर्म अल शेख येथे झालेली चर्चा.*


डॉ. मनमोहनसिंग व युसूफ गिलानी

लपविण्यासारखे काही नाही, म्हणून मुद्याचा उल्लेख करण्याचे दोन्ही बाजूंनी मान्य केले.

गिलानी यांनी भारतविरोधी प्रचार करण्यास क्षणभरही उशीर केला नाही. मायदेशी परतताच पत्रकार परिषद घेऊन पाकिस्तानच्या शिष्टाईचे हे यश असल्याची बढाई मारली, एवढेच नव्हे, तर भारताच्या विरोधात हा मुद्दा आता जागतिक व्यासपीठावरून उपस्थित करण्यात येईल, असे एका मंत्र्याने जाहीर केले. याचा अर्थ, जागतिक व्यासपीठावर भारत जेव्हा जेव्हा पाकप्रणित दहशतवादाचा मुद्दा उपस्थित करील, तेव्हा बलुचिस्तानचा मुद्दा उपस्थित केला जाईल. ''पाकिस्तानकडे पुरावा असेल, तो द्यावा,'' असेही डॉ सिंग यांनी गिलानी यांना सांगितले. त्याची कागदपत्रे बनविण्याचे काम पाकिस्तान करीत आहे, असे वृत्त आहे. ती कितीही बनावट असली व आपला त्याच्याशी काही संबंध नाही, असे उत्तर भारताने दिले, तरी पाकिस्तानचा आरोप कायम राहील. माकडाच्या हाती कोलीत देण्यासारखा हा प्रकार आहे. त्यामुळे भारताविरूद्ध कारवाया करण्याचा हक्कच आपल्याला आहे, असाही दावा पाकिस्तान करू शकेल. म्हणूनच माजी परराष्ट्र मंत्री यशवंत सिन्हा यांनी म्हटल्याप्रमाणे या उल्लेखाचे परिणाम भारताला दीर्घ काळ भोगावे लागतील. या संदर्भात आणखी एका प्रसंगाची आठवण येते. गेल्या वर्षी 'इंडिया टुडे' नियतकालिकाने आयोजित केलेल्या 'कॉन्क्लेव'साठी पाकिस्तानचे माजी अध्यक्ष व माजी जनरल परवेझ मुशर्रफ भारतात आले होते. त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना, ''पाकिस्तानमध्ये भारतीय गुप्तचर संघटना 'रॉ'(आरएडब्ल्यु) काय कारवाया करीत आहे, याचा पुरावा आपल्याकडे असल्याचे सांगितले होते. भारतीय अधिकाऱ्यांची नावेही ते सांगण्यास तयार होते. त्याचे खंडन त्यावेळीही सरकारने केले नाही. या घटनेची तुलना, इराणचे अध्यक्ष महंमद अहमदीनजाद यांनी २४ सप्टेंबर २००७ रोजी न्यूयॉर्कमधील कोलंबिया विद्यापिठात भाषण करताना माजी अध्यक्ष जॉर्ज बुश यांच्यावर केलेल्या टीकेशी करता येईल. भारत व अमेरिका ही दोन्ही राष्ट्रे लोकशाही आहेत, म्हणूनच भारतावर हल्ला करणारे जनरल मुशर्रफ येथे येऊन वाटेल तो दावा करू शकतात. मुद्दा आहे, तो संयुक्त निवेदनात बलुचिस्तानचा उल्लेख करून मुशर्रफ यांनी केलेल्या दाव्याला डॉ सिंग यांनी अधिक बळ दिले काय? मावळते परराष्ट्र सचिव शिवशंकर मेनन यांनी या वादाच्या संदर्भात काही निवडक पत्रकारांबरोबर अनौपचारिकरित्या बोलताना जुलैच्या शेवटच्या आठवड्यात सांगितले, की झुल्फीकार अली भुत्तो यांनी १९७३ मध्ये असाच आरोप केला होता. बलुचिस्तानचे राज्यपाल व अंतर्गत खात्याचे मंत्री नवाब अकबर शहाबाज बुक्ती यांची २६ ऑगस्ट २००६ रोजी हत्या झाली, त्यानंतर पुन्हा याच स्वरूपाचे आरोप भारतावर करण्यात आले. ते म्हणाले, की पाकिस्तानच्या काही न्यायालयात या संदर्भात खटलेही दाखल करण्यात आले होते. तथापि, कोणत्याही पुराव्याअभावी ते टाळून लावण्यात आले. अलीकडे तालिबानचा म्होरक्या बैतुल्ला महसूद याला भारत मदत करीत असून, तो पाकिस्तानवर हल्ले चढवित असल्याचा आरोप पाकिस्तानने केला होता. लाहोर येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात भारताचा हात असल्याची कोल्हेकुईही पाकिस्तानच्या नेत्यांनी केली होती. गिलानी यांनी केलेल्या आरोपाची पार्श्वभूमी ही असल्याचे सांगून मेनन म्हणाले, की शर्म अल शेख येथे बलुचिस्तानचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला तेव्हा, ''अंतर्गत मामला दुतर्फा वाटाघाटीत उपस्थित करावायचा असेल, तर करू शकता, परंतु भारताने हस्तक्षेप करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही,'' असे त्यांना सांगण्यात आले. पाकिस्तानी वृत्तपत्रे व माध्यमांनी त्याचे जोरदार भांडवल केले. भारतातील माध्यमे व वृत्तपत्रांनी हा मुद्दा इतका का उचलून धरला?'' अशीही मेनन यांची पृच्छा. परंतु बलुचिस्तानच्या उल्लेखाने भारताचे हितसंबंध कसे राखले जातात, या प्रश्नास त्यांच्याकडे उत्तर नव्हते. संसदेत या विषयावरून जोरदार वाद चालू असता डॉ सिंग यांनी मेनन यांना, परराष्ट्र धोरणाबाबत संसद सदस्यांचे प्रबोधन करण्यास पाठविले. तेथे मेनन यांनी निवेदनाचा मसुदा लिहिताना 'गडबड' झाल्याची चक्क कबुली दिली. ''संबंधित निवेदनाला कायद्याच्या दृष्टीने महत्व नाही,'' असे वेगळेच तारे परराष्ट्र राज्यमंत्री शशी थरूर यांनी तोडल्याने विरोधक आणखीच चेकाळले आणि त्यांनी



भारताचे परराष्ट्रमंत्री एस. एम. कृष्णा आणि पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री शहा महंमद कुरेशी

‘हल्ला बोल’ सुरू केला. अमेरिकेबरोबर झालेल्या नागरी अणुऊर्जा करारावरून यापूर्वी भाजप व डावी आघाडी एकत्र आले होते. पण यावेळी त्यात समाजवादी, राष्ट्रीय लोकदल, जनता दल संयुक्त यांचीही भर पडली आहे. ‘‘डॉ सिंग पाकिस्तानच्या गोटातच सामील झाले,’’ असा आरोप माजी परराष्ट्र मंत्री यशवंत सिन्हा यांनी केलाय.

या घटनाक्रमात परराष्ट्र मंत्री एस.एम.कृष्णा इतके निष्प्रभ ठरले, की त्यांची तुलना आता माजी गृहमंत्री शिवराज पाटील यांच्या बरोबर केली जात आहे. ३० जुलै रोजी संसदेतील चर्चेला त्यांनी इतके मिळमिळीत उत्तर दिले, की ते त्या पदावर अधिक काळ राहिल्यास परराष्ट्र धोरणाबाबतचा गोंधळ अधिक वाढण्याची शक्यता दिसते. आंतरराष्ट्रीय राजकारण, परराष्ट्र धोरण याविषयावर त्यांचा काही अभ्यास नाही, की त्यांना आकलन नाही. त्यामुळेच त्यांचे उत्तर होण्यापूर्वी माजी परराष्ट्रमंत्री व विद्यमान अर्थमंत्री प्रणब मुकर्जी यांना डॉ. सिंग यांच्या मदतीस धावून यावे लागले. अर्थात कृष्णा यांचे भाषण ऐकण्यास कुणीही तयार नव्हते. भाजप, समाजवादी पक्ष, डावे पक्ष यांनी सभात्याग केला. वादग्रस्त मुद्यांवर ते बोललेच नाही. ‘‘श्रीलंका व अन्य मुद्यांवरच बोला,’’ असे त्यांना सांगण्यात आले होते.

‘‘दहशतवादी कारवाया व सर्वंकष वाटाघाटींची प्रक्रिया एकमेकाशी निगडीत असू नये,’’ हा निवेदनातील दुसरा वादग्रस्त मुद्दाही विरोधकांनी उचलून धरला. संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार आल्यापासून प्रथमच भाजपने या मुद्यांवरून राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांची भेट घेऊन निषेध नोंदविला. ‘‘दहशतवाद्यांविरूद्ध कारवाई केल्याचा दर्शनीय व विश्वासार्ह पुरावा जोवर दिसत नाही, तोवर वाटाघाटीची प्रक्रिया सुरू होणार नाही,मम अशी स्पष्ट भूमिका डॉ सिंग यांनी सातत्याने घेतली आहे. त्या भूमिकेलाच वरील दुसऱ्या मुद्याने खो घातला. ‘‘अमेरिकेच्या दबावामुळे संबंधित वाक्य संयुक्त निवेदनात घालण्यात आले,’’ असाही आरोप विरोधकांनी केला. निवेदनातील वाक्याचा सरळ अर्थ असा, की एकीकडे दहशतवादी कारवायाही चालू राहातील व दुसरीकडे सर्वकष वाटाघाटीही. अर्थात या वाक्यावरून वादळ होईल, याची जाणीव झाल्यानेच डॉ सिंग यांनी शर्म अल शेख येथून निघण्यापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत खंडन व खुलासा केला. तरीही शंका कायम राहिली व तिचे तीव्र पडसाद संसदेच्या दोन्ही सभागृहात उमटले. काँग्रेस पक्षातही खळबळ माजली. डॉ सिंग यांच्यावर प्रथमच पक्षातून टीकेचा सूर उमटला. त्यांची बाजू उचलून धरण्यास अभिषेक सिंघवी, मनीश तिवारी आदी प्रवक्ते माघार घेऊ लागले, अथवा उडवा उडवीची उत्तरे देऊ लागले. शेवटी सोनिया गांधी डॉ सिंग यांच्याबरोबर ठामपणे उभ्या राहिल्यामुळे त्यांचे हात बळकट झाले. ३० जुलै रोजी झालेल्या काँग्रेसच्या संसदीय पक्षाच्या बैठकीपुढे बोलताना श्रीमती गांधी यांनी डॉ सिंग यांच्या भूमिकेला पूर्ण पाठिंबा असल्याचे जाहीर केल्याने पक्षांतर्गत मतभेदाचे वातावरण निवळले.

भारत व पाकिस्तानच्या गेल्या काही वर्षांच्या संबंधांकडे पाहिल्यास असे दिसते, की दहशतवादी कारवाया चालू असतानाही दुतर्फा चर्चेची प्रक्रिया खंडित झालेली नाही. वाटाघाटी मात्र स्थगित झाल्या आहेत, पण त्या काही महिन्यांपुरत्या. या संदर्भात डॉ सिंग यांनी लोकसभेत केलेला खुलासा महत्वपूर्ण ठरतो. डॉ सिंग यांची रशियातील यक्तरीनबर्ग येथे पाकिस्तानचे अध्यक्ष झरदारी यांच्याबरोबर भेट झाली होती. मुंबईतील हल्ल्यानंतरची ही पहिली भेट. त्यानंतर शर्म अल शेख येथे गिलानी यांची भेट झाली. इटलीमध्ये एस.एम.कृष्णा व पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री शहा महंमद कुरेशी यांचीही अलीकडे भेट झाली. तिचे ‘सकारात्मकम असे वर्णन कुरेशी यांनी इस्लामाबाद येथे केले. त्यामुळे उच्चस्तरीय चर्चेच्या प्रक्रियेत खंड पडलेला नाही. दोन्ही देशांच्या परराष्ट्र सचिवांनी भेटावे, असे शर्म अल शेख येथे ठरले. डॉ सिंग म्हणाले, की चर्चेशिवाय पर्याय नाही, युद्ध हा तोडगा नाही. त्यांनी इशारा दिला की ‘‘चर्चा केली नाही, तर त्रयस्थ राष्ट्राच्या (अमेरिका) मध्यस्थीला प्रोत्साहन मिळेल व भारताला ते मान्य नाही.’’ सिंग यांनी या

संदर्भात माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी केलेल्या प्रयत्नांच्या उल्लेख केल्याने भाजप काहीसा निरूत्तर झाला. पाकप्रणित दहशतवाद शिगेला पाहोचला होता, तेव्हाही चर्चा, बस शिष्टाई, आग्रा शिखर वार्ता आदी सारे काही वाजपेयी यांनी चालू ठेवल्याचे सांगितले. मुंबईवरील हल्ल्याची सूत्रे पाकिस्तानमधून हालली याची कबुली पाकिस्तानने प्रथमच दिल्याचे व त्याबाबतची कागदपत्रे (डोसियर) भारताला सादर केल्याचे सांगून, ''हे श्रेयही या सरकारचे आहे,'' असे ते म्हणाले. संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या ७ ऑगस्ट रोजी संपुष्टात येत आहे. त्यामुळे हिवाळी अधिवेशन होईपर्यंत सदनाचे व्यासपीठ विरोधकांना उपलब्ध नसेल. परंतु ते याच मुद्यांचा प्रचार महाराष्ट्र, हरियाना, झारखंड आदी राज्यात होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत करणार, यात शंका नाही.


अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा आणि डॉ. मनमोहनसिंग

दरम्यान अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्री हिलरी क्लिंटन यांनी भारताला दिलेली भेट, अणुऊर्जा कराराची अमलबजावणी, इंधन व तंत्रज्ञान पुरवठा, तापमान बदलाच्या मुद्यावरून अमेरिका व प्रगत राष्ट्रांकडून येणारा दबाव, अण्वस्त्र प्रसार बंदी कराराबाबत (एनपीटी) अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांनी घेतलेली आग्रही भूमिका, अणुऊर्जा कराराचा त्याबरोबर लावण्यात येणारा संबंध, अमेरिकन तपासणीकांना देण्यात येणारा प्रवेश, या मुद्द्यांचे निराकरण डॉ सिंग यांनी केले. भारताचे सार्वभौमत्व धोक्यात आल्याचा आरोप गेले पाच वर्ष होत आहे. विरोधक दोन्ही डगरींवर हात ठेवून आहेत. ''सरकार अमेरिकेच्या दबाबाखाली वागत आहे.'' तसेच, परराष्ट्र धोरणही


हिलरी क्लिंटन व डॉ. मनमोहनसिंग

अमेरिकाधार्जिणे झाल्याचा आरोप भाजप व डावी आघाडी पक्ष करीत आहेत. ''पंतप्रधान थेट पाकिस्तानच्या गोटात'' सामील झाल्याचे यशवंत सिन्हा म्हणाले. या दुटप्पी भूमिकेचा समाचार प्रणब मुकर्जी यांनी घेतला. त्यांच्या भाषणादरम्यान मार्क्सवादी कम्युनिस्ट नेते बसुदेव आचार्य यांनी ठोकाठोकी करताच, आवाज उंचावून मुकर्जी म्हणाले, ''तुम्हाला काय हवे आहे, हे मला चांगले ठाऊक आहे. तुम्हाला दक्षिण आशिया अण्वस्त्रविरहित हवा आहे, याचा अर्थ चीन, रशिया यांनी अण्वस्त्रे बाळगली तरी चालतील, पण भारताने मात्र तसे करता कामा नये.'' अमेरिकेने इराकमध्ये व अन्यत्र केलेल्या मानवाधिकाराच्या उल्लंघनाचा ते डावे पक्ष जोरदार निषेध करतात, परंतु अलीकडे चीनमधील शिंजियांग प्रांतातील उसळलेला हिंसाचार व झालेले मानवाधिकाराचे उल्लंघन याबाबत मात्र त्यांची बोबडी वळते. त्यांच्यासाठी रशिया 'मदरलँड' आहे. त्यामुळे तेथील मानवाधिकाराच्या उल्लंघनाबाबत बोलायचे कसे?

अणुऊर्जा प्रकल्पांना लागणाऱ्या इंधन व तंत्रज्ञान पुरवठ्याचा संबंध ओबामा सरकार अण्वस्त्र प्रसार बंदी कराराशी लावून भारताला त्यावर स्वाक्षरी करण्यासाठी दबाव आणणार, असे मानले जाते. परंतु डॉ सिंग यांनी त्याबाबत स्पष्ट व योग्य भूमिका घेऊन, ''या करारावर भारत स्वाक्षरी करण्याचा प्रश्नच नाही,'' असे म्हटले आहे. त्याच प्रमाणे, ''भारताला मिळालेली सूट (क्लीन वेव्हर ) व जी-८ गटातील राष्ट्रांची प्रतिकूल भूमिका यांचा काही संबंध नसून अणुइंधन पुरवठादार गटातील ४५ राष्ट्रे भारतापुढे अडचणी निर्माण करणार नाही,'' अशी आशा व्यक्त केली आहे. त्याबाबत आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील

दबावाचे राजकारण कोणत्या वाटेने जाणार, याचा अंदाज आज घेता येणार नाही. त्यासाठी भारताला नेहमीच जागरूक राहावे लागेल. शिवाय, अणुइंधनाचा वापर कसा केला जात आहे, याची तपासणी करण्यासाठी अमेरिकेचे तपासणीदार येतील, तेव्हा काय वाद निर्माण होतील, याचाही अंदाज आज घेणे कठीण.



या वादग्रस्त वाटचालीतही काही चांगल्या गोष्टी घडत आहेत. प्रणव मुकर्जी यांनी अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदींमुळे २०१० अखेर अर्थव्यवस्थेचा वेग ८ ते ९ टक्क्यावर जाईल, असा अंदाज आहे. २७ जुलै रोजी लोकसभेतील अर्थसंकल्पविषयक चर्चेला उत्तर देताना त्यांनी जाहीर केलेल्या गृहकर्जावरील १ टक्का अनुदानामुळे गृहनिर्माण उद्योग व खरेदीला चालना मिळेल. औद्योगिक क्षेत्रासाठी करसूटीची तरतूद केल्याने औद्योगिक उत्पादनाला चालना मिळेल. रोखेबाजारातही मुकर्जी यांच्या भाषणानंतर तेजी आली. तथापि, त्यात नेहमी चढउतार होतात, ते चालू राहातील. मध्यम वर्गालाही त्यामुळे गुंतवणूक करताना खबरदारी घ्यावी लागेल. ग्रामीण भागातही सायलेन्ट रिव्होल्यूशन चालू आहे. 'इकॉनॉमिक टाईम्सममधील एका वृत्तानुसार, ग्रामीण भागात होणाऱ्या मोटार, स्कूटर्स व दुचाकींच्या विक्रीचे प्रमाण १.७ अब्ज डॉलर्सपर्यंत गेले असून, ग्राहकोपयोगी वस्तूंच्या विक्रीचे प्रमाण एक अब्ज डॉलर्स इतके झाले आहे. ग्रामीण भागातील बाजारपेठ ही २७ अब्ज डॉलर्स एवढी प्रचंड आहे. परिणामतः बहुराष्ट्रीय कंपन्याची नजरही त्याकडे वळू लागली आहे. देशाचा सर्वांगीण विकास व्हावयाचा असेल, तर वीज, रस्ते, संचारमाध्यमे व अन्य पायाभूत सोयी यात अमुलाग्र सुधारणा व्हावयास हवी. यादृष्टीने वाहतूक मंत्री कमलनाथ यांनी २२ जुलै रोजी केलेली घोषणा महत्वपूर्ण ठरते. ''येत्या तीन वर्षात १५ हजार कि.मीचे महामार्ग व रस्ते बांधले जातील व त्यासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्राचे संयुक्त साह्य व गुंतवणुक यांची जगातील सर्वात मोठी योजना सुरू करण्यात येईल,'' असे त्यांनी म्हटले आहे. त्यावर ७० अब्ज डॉलर्स (३५०,००० कोटी रू) खर्च होणार आहेत.'' लोखंड, सिमेंट आदी पायाभूत उद्योगांचा पहिल्या तिमाहीतील प्रगतीचा अहवाल समाधानकारक आहे. अर्थव्यवस्थेचा वेग ६ टक्के कायम राखण्यासाठी तो उपयोगी पडेल.




आणखी एक मानाचा तुरा म्हणजे, विशाखापट्टणम येथे अणुऊर्जेवर चालणाऱ्या पूर्णपणे देशात तयार केलेल्या 'अरिहंतम या पहिल्या पाणबुडीला बंगालच्या उपसागरात सोडून भारताने जगातील सहा राष्ट्राच्या गटात प्रवेश केला, हा होय. ही घटना नजरेआड करता येणार नाही. पुढील दोन वर्षेतिच्या चाचण्या चालणार आहेत. सहा हजार टन




*अणुऊर्जेवर चालणारी अरिहंत पाणबुडी.*

वजन असलेल्या या पाणबुडीत ८० मेगॉवॉटची अणुभट्टी आहे. बुडीत अवस्थेत तिचा वेग ३० ते ३४ नॉट्स असेल व समुद्रपातळीवर १२ ते १५ नॉट्स असेल. भारतीय नौदलाची प्रहार व युद्धक्षमता त्यामुळे मोठ्या प्रमाणावर वाढेल. या प्रकल्पावर तब्बल ३० हजार कोटी रू. खर्च झाले असून रशियाचे मोलाचे साह्य लाभले आहे. त्यातून ७०० कि.मी दूर असलेल्या लक्ष्यावर क्षेपणास्त्र लादता येईल. भारताला या क्षेत्रात अद्याप मोठे पाऊल टाकायचे आहे. कारण अमेरिकेकडे या प्रकारच्या ७४, रशियाकडे ४४, ब्रिटनकडे १३, फ्रान्सकडे १० व चीनकडे दहा पाणबुड्या आहेत व त्यांची प्रहारक्षमता व आकार या पाणबुडीपेक्षा मोठा आहे.

भारताने अॅवॉक्स हे अत्याधुनिक लढाऊ विमान अलीकडे खरेदी केले आहे. याच प्रकारची आणखी काही विमाने येत्या दोन वर्षात खरेदी करण्यात येतील. एअर चीफ मार्शल प्रदीप वसंत नाईक यांच्यानुसार, ''वायुदलाच्या आधुनिकीकरणाची महत्वाकांक्षी योजना आखण्यात आली आहे. त्यात भारताचे सुरक्षाविषयक चित्र पाहाता, येत्या पंचवीस ते तीस वर्षांतील संभाव्य धोक्यांचा विचार करण्यात आला आहे.'' चीन व भारताच्या वायुदलाची तुलना आपण कशी करणार, असे विचारता ते म्हणाले, की चीनकडे लढाऊ विमानांची संख्या अधिक आहे, परंतु निष्णात वैमानिकांची कमतरता आहे. ''आपल्याकडे लढाऊ विमानांची संख्या कमी असली, तरी हवाई युद्धात तरबेज असलेले वैमानिक आहेत. त्यामुळे आपली प्रहारक्षमता अधिक आहे.'' ते म्हणाले, ''चीनला मी शत्रू मानीत नाही, तर एक आव्हान मानतो.'' येत्या काही वर्षात भारताला चीन व पाकिस्तान या दोन्ही आव्हानांचा सामना करण्याची तयारी करावी लागेल.

■■■



*अॅवॉक्स अत्याधुनिक लढाऊ विमान व एअर चीफ मार्शल प्रदीप वसंत नाईक*



# अस्त एका अस्सल अभिनेत्याचा !

– मुकुंदानंद

आपल्या सदाबहर, बहुरंगी कलागुणांच्या बळावर मराठी नाट्य चित्रपटसृष्टीच नव्हे तर हिंदी चित्रपटांची दुनियाही गाजविणारा एक अस्सल अभिनेता निळू फुले यांच्या निधनामुळे आता कायमचा काळाच्या पडद्याआड गेला आहे. १९७० च्या दशकात 'कथा अकलेच्या कांद्याची' हे विनोदी वगनाट्य आणि एक गाव बारा भानगडी या मार्मिक मर्मभेदी चित्रपटाद्वारे कलेच्या प्रांतात दाखल झालेल्या निळुभाऊंनी पुढे तब्बल चार दशके अभिनयाच्या प्रांतावर आणि रसिक मनावर राज्य केले. खरे तर, फाटक्याच म्हणाव्या अशा शरीरयष्टीच्या आणि खरखरत्या, सदोष आवाजाच्या या कलावंताच्या एकंदर व्यक्तिमत्त्वात वर-वर पाहाता विशेष आणि खास वाटावे असे काहीही नव्हते, परंतु साकारण्यास मिळालेली प्रत्येक भूमिका- मग ती ठोकळेबाज खलनायकाची असो वा दिलखुलास हसविणाऱ्या विनोदवीराची, बेरकी-धूर्त सहकार सम्राटाची असो वा तत्त्वनिष्ठ त्यागी स्वातंत्र्यसैनिकांची- निळुभाऊंनी अशा काही सफाईने व ऐटीत साकारली की बस्स! हा माणूस हाडाचा कलावंत होता हेच खरे! अर्थात तो सर्वांगांनी घडण्यात राष्ट्रसेवा दलाच्या संस्कारांचा फार मोठा वाटा होता, हेही निश्चित. निळुभाऊंच्या प्रदीर्घ आणि अनेक अर्थांनी वैभवशाली म्हणाव्या अशा अभिनय कारकिर्दीचा 'श्रीगणेशा'च मुळात राष्ट्रसेवा दलाच्या कला पथकात झाला. पु. लं. च्या मिश्किल लेखणीतून आकारास आलेले पुढारी पाहिजे सारखे राजकीय व्यंगात्मक नाटक आणि बिन बियांचे झाड वा कोणाचा कोणाला मेळ नाही सारखी वगनाट्चे याद्वारे हा हरहुन्नरी अभिनेता प्रथम रंगमंचावर आला, परंतु फूटलाइटच्या प्रकाशझोतात तो खऱ्या अर्थाने चमकायला सुरूवात झाली ती मात्र ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक अनंत माने यांच्या एक गांव बारा भानगडी' या तुफान यशस्वी चित्रपटातील 'झेले अण्णा' ही जबरदस्त बेरकी व्यक्तीरेखा साकारल्यानंतरच! या झेले अण्णांनी गावगुंडीचे विलक्षण प्रत्ययकारी म्हणावे असे दर्शन तर रसिकांना घडविलेच पण जणू अशा बदमाष, बिलंदर महाभागांच्या भूमिका करण्यासाठीच जन्माला आलेल्या निळूभाऊंना यश आणि किर्तीच्या शिखरावर नेऊन बसविले. पुढील काळात दीडशेहून अधिक मराठी चित्रपटांच्या बरोबरीने पंचवीस एक हिंदी चित्रपटांतही निळूभाऊंनी असंख्य, वेगवेगळ्या व्यक्तीरेखा साकारल्या आणि नेणत्यांप्रमाणे जाणत्यांचीही दाद मिळविले पण ते खरे शोभले, खुलले अन् भावले ते मात्र 'झेले अण्णा' म्हणूनच, यात तीळमात्र संशय नाही. ही व तत्सम अनेक भूमिका वठवितांना त्यांना कधी 'मेकअप सारख्या बाह्य घटकांची गरजच भासली नाही. साधा शर्ट पायजमा वा धोतर-कुडता त्यावर असलेच तर एखादे जाकिट आणि डोक्यावर तिरपी ठेवलेली पांढरी टोपी या टिपीकल 'पुढारी छाप' केश-वेषभूषेतच हा बहाद्दर गडी खुलायचा आणि पाहता-पाहता ''तो आला, त्याने पाहिले आणि त्याने जिंकले'' असा काही तरी विलक्षण अनुभव रसिकांना अगदी



**चार दशकांहून अधिक काळ चित्रपट-नाट्यसृष्टी आणि रसिक मनावर राज्य केलेले ज्येष्ठ कलावंत निळू फुले नुकतेच कालवश झाले. त्यांच्या निधनाने केवळ एक सदाबहार अभिनेताच नाही तर सामाजिक जबाबदाऱ्यांचे नेमके भान असलेला एक चांगला माणूसही आपण गमावला आहे..**



सहजतेने देऊन जायचा. डॉ. श्रीराम लागू यांच्यासारख्या सर्वदृष्ट्या श्रेष्ठ व अभ्यासून अभिनेत्याच्या तोडीस तोड अभिनय करण्याची जिद्द व क्षमता गेल्या पंचवीस वर्षात फक्त आणि फक्त निळूभाऊच दाखवू शकले, हा काही अपघात वा योगायोग नाही. हा माणूस जातीवंत कलावंत तर होताच पण समाजवादाची पताका खांद्यावर घेऊन सजग आयुष्य जगलेला एक सेवाभावी कार्यकर्ताही होता. चित्रपट नाटकांच्या मायावी व मुखवट्यांच्या जगात अगदी सफाईदारपणे वावरत असतांना तो आपण ज्येष्ठ-श्रेष्ठ समाजसुधारक ज्योतिबा फुले यांच्यासारख्या 'महात्म्यांचे' वंशज व वारसदार आहोत, हे कधीही विसरला नाही. आणि त्यामुळेच तोंडावरचा रंग पुसून स्टुडिओ वा रंगमंदिरातून बाहेर पडल्यानंतर त्याची पावले वळायची ती कोणत्या-ना-कोणत्या सामाजिक कार्याकडेच! त्यांच्यात दडलेल्या या विचारशील व कृतीशूर समाजसेवकाचे सर्वप्रथम दर्शन घडले ते आणीबाणीच्या अस्वस्थ कालखंडात. त्यावेळी लोकशाही मूल्ये व विचार-उच्चार स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी निळूभाऊंनी, पु.लं. सारख्या दिग्गजांच्या बरोबरीने जे रान उठविले होते ते त्यांची अस्सल जातकुळीच स्पष्ट करणारे होते. विशेष म्हणजे त्यावेळी त्यांच्यासारख्यांनी केलेल्या झंझावाती प्रचाराच्या बळावरच देशात लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी स्थापलेल्या 'जनता पक्षा'चे सरकार आले होते. परंतु त्याचा लाभ उठवून आपले आणखी काही 'भले' करून घेण्याचा विचारही निळूभाऊंच्या मनात कधी आला नाही... आणि तेच तर त्यांचे खरे मोठेपण होते. अर्थात त्याची कदर सर्वसामान्य नागरिकांप्रमाणे सत्तापदस्थांनी आणि



## 'ते दान गुप्त ..... !

गरीबीमुळे निळूभाऊ उच्चविद्याविभूषित होऊ शकले नव्हते. परंतु शिक्षणाबद्दलचे त्यांचे प्रेम मात्र दांडगे होते. त्यामुळे पुढे आयुष्यात आर्थिक सुबत्ता प्राप्त झाल्यानंतर त्यांनी गोरगरीबांच्या मुलांना शिकण्याची संधी मिळवून देऊन मोठे करायचे जमू व्रतच घेतले. या व्रताचा एक भाग म्हणून ते शूटिंग वा नाटकांच्या प्रयोगांच्या निमित्ताने छोट्या-छोट्या गावांत जात तेव्हा तेथील शाळांना आवर्जून भेट देत. त्या भेटीत ते हेडमास्तरांकडून शाळेतील गरीब पण हुशार विद्यार्थ्यांची माहित विचारून घेत आणि मग घरी परतल्यावर त्या मुलांसाठी शक्य असेल तेवढी आर्थिक मदत मनीऑर्डरद्वारा नियमितपणे पाठवित. विशेष म्हणजे त्यांच्या या विलक्षण समाजसेवी उपक्रमाची माहिती आजवर फारशी कोणालाच नव्हती. कारण अच्युतराव व रावसाहेब हे पटवर्धन बंधू आणि एस.एम. जोशी यांच्यासारख्या थोर व्रतस्थ नेत्यांच्या संस्कार शाळेत वावरलेल्या या कलावंतांच्या जीवनाची बैठकच मुळी 'दे दान गुप्त, कधी न बोले' हे तत्व होते.

संगीत नाटक अकादमी सारख्या प्रतिष्ठीत संस्थांनीही वेळोवेळी केली हे नाकारून चालणार नाही. सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून महाराष्ट्र शासनाने केलेला त्यांचा त्रिवार गौरव, १९९१ मध्ये राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार देऊन संगीत नाटक अकादमीने केलेला सन्मान आणि गेल्याच वर्षी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने बहाल केलेला 'जीवन गौरव पुरस्कार' ही त्याची काही उदाहरणे होत. या सर्व बहुमानांचे मोल निळूभाऊ पूर्णपणाने जाणून होते, पण ते मिळवून थांबण्यात त्यांनी कधीच धन्यता मानली नाही. आयुष्यात उत्तरार्धात व्यावसायिक कामांचा मोह टाळून ते मुख्यतः रमले ते अंधश्रद्धानिर्मूलनाच्या कार्यात आणि सामाजिक कृतज्ञता निधीच्या उभारणीत ! कलाक्षेत्राप्रमाणे येथेही ते डॉ. लागूंच्या बरोबरीने वावरले आणि डॉ. बाबा आढाव व डॉ. नरेंद्र दाभोळकर यासारख्या निरलस सेवाभावींच्या प्रभावळीत स्वतःचे असे खास स्थान निर्माण करून गेले. डॉ. लागू यांनी म्हटल्याप्रमाणे 'निळूभाऊ' जागतिक दर्जाचे अभिनेते तर होतेच पण सामाजिक मूल्य व जबाबदाऱ्यांचे भान असलेला चांगला माणूस ही होते. आता त्यांची स्मृती अमर रहावी म्हणून मोठे स्मारक उभारण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी जाहीर केला आहे, निळूभाऊंचे निकटचे सहकारी आणि विविध क्षेत्रातील तज्ज्ञांसी सल्लामसलत करून हे स्मारक होणार आहे. ते आकारास येईल तेव्हा 'निळू फुले' नावाची व्यक्ती किती मोठी होती याचा प्रत्यय तर सर्वसामान्य रसिकांना येईलच पण कलेप्रमाणे समाजसेवेच्या क्षेत्रातही उदयास येणाऱ्या नव्या पिढीस काही वेगळी प्रेरणाही जरूर, जरूर मिळेल !

■■■


विजेचा प्रश्न सुटतोय!
- सुनील तटकरे

१९६० ते १९९० अशा तीन दशकांत महाराष्ट्राने विजेच्या बाबतीत लक्षणीय प्रगती केली. या काळात राज्य विजेच्या बाबतीत स्वयंपूर्णच नव्हे तर अधिक्य असलेले राज्य ठरले. गुजरात, आंध्र, कर्नाटक, गोवा या शेजारी राज्यांना महाराष्ट्र नियमितपणे वीज देत असे. १९९१ पासून केंद्र सरकारने उदारीकरणाचे धोरण स्वीकारले. या धोरणातूनच महाराष्ट्रात दाभोळचा एन्रॉन प्रकल्प आला. त्याचे झालेले राजकारण सर्वश्रुत आहे. हे राजकारण मुख्यतः युतीने केले. आज राज्यात जे विजेचे प्रश्न निर्माण झालेले आहेत त्याच्या मुळाशी युती शासनाने एन्रॉनचे केलेले राजकारणच होय.

## वीज प्रश्न का चिघळला?

१९९३ साली तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी अतिशय सावधपणे एन्रॉनच्या केवळ ६९५ मे. वॉ. च्या पहिल्या टप्प्याला पथदर्शी प्रकल्प म्हणून मान्यता दिली होती. या प्रकल्पातून जो अनुभव येईल त्यानुसार एन्रॉनच्या पुढील टप्प्यांबाबत निर्णय घेतला जाईल असे त्यांनी ठरविले होते. परंतु त्या काळात भाजप-सेनेने या प्रकल्पाच्या विरोधात गदारोळ उठवून सत्तेत आल्यास प्रकल्प अरबी समुद्रात बुडविण्याची घोषणा राणा भीमदेवी थाटात केली होती. त्याप्रमाणे १९९५ च्या निवडणुकीत सत्तेत आल्याबरोबर तो प्रकल्प बुडविलाही होता. परंतु अवघ्या १० ते १५ दिवसांतच तो जिवंतही केला. या परदेशी प्रकल्पाबाबत जो सावध पवित्रा श्री. पवार यांनी घेतला होता. त्याकडे दुर्लक्ष करून युतीने २१८४ मे. वॉ. चा संपूर्ण प्रकल्प महाराष्ट्राला खड्ड्यात घालणाऱ्या सर्व अटींसह मान्य केला. परिणामी या प्रकल्पातून १९९९ च्या काळात ४ रुपये ते २७ रुपये प्रति युनिट अशा दराने वीज घ्यावी लागली. या प्रकल्पातील वीज घेण्यासाठी स्थिर आकारापोटी प्रचंड पैसे दरमहा द्यावे लागणार होते. त्यातून महाराष्ट्रातील विद्युत क्षेत्रच नव्हे तर संपूर्ण राज्यच उद्‌ध्वस्त झाले असते. म्हणून १९९९ साली आघाडी सरकार पुन्हा सत्तेत आल्यावर एन्रॉनचा करार स्थगित करण्यात आला. तेव्हा एन्रॉनने लवादापोटी महाराष्ट्रावर २७ हजार कोटी रुपयांचा नुकसान भरपाईचा दावा लंडनच्या कोर्टात दाखल केला. दाभोळमुळे अख्खा महाराष्ट्र जेरीस आला. वास्तविक दाभोळ २१८४ मे. वॉ., भद्रावती १०८० मे. वॉ.

**आपल्या वीजनिर्मिती केंद्रांना पुरेसा व दर्जेदार कोळसा उपलब्ध व्हावा, या दृष्टिकोनातून कंपनी सातत्याने अथक प्रयत्नशील आहे. असा कोळसा उपलब्ध न झाल्यास सध्याच्या क्षमतेनुसार वीजनिर्मिती करण्यात अडचणी येतात. अनेकदा उपलब्ध कोळशाच्या दर्जानुसार चालू संचाच्या भारात विपरीत बदल होत असतात. शिवाय संचांच्या भारात वारंवार बदल झाल्यास बॉयलर ट्युब लिकेजची समस्या उद्‌भवण्याची शक्यता अधिक असते. उपलब्ध कोळशाचा जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे वापर करण्यासाठी कंपनी प्रयत्नशील आहे. वीजनिर्मिती हे अखंड उत्पादन कार्य आहे. महानिर्मितीच्या कर्मचाऱ्यांना अनेकदा विपरीत परिस्थितीत तातडीची कामे करावी लागतात. पुर्नरचनेनंतर कंपनी समोरील विविध आव्हाने सक्षमपणे पेलण्यासाठी ऊर्जा क्षेत्रातील तज्ञसंस्थाच्या मार्गदर्शनाखाली महानिर्मितीचे तंत्रज्ञ व अधिकारी यांना योग्य प्रकारे प्रशिक्षित करण्यात येत आहे.**

आणि पाताळगंगा ४१० मे. वॉ. असे एकूण ३६७४ मे. वॉ. चे नियोजन होते. नियोजनानुसार २००३-०४ मध्येच खासगी क्षेत्रातील हे प्रकल्प आले असते तर राज्याला वीजटंचाईच्या समस्येला सामोरे जावेच लागले नसते. परंतु एन्रॉन वादामुळे खासगी क्षेत्रातील सारेच प्रकल्प मागे पडले. खासगीतले प्रकल्प येणार म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे प्रकल्प आधीच मागे घेण्यात आले होते. परिणाम व्हायचा तोच झाला. क्षमता वाढ कुंठित झाली. दरम्यान विजेची मागणी वाढत गेली आणि राज्यात भारनियमनाचे युग सुरू झाले.

## प्रश्नाची उकल

महाराष्ट्रातील एन्रॉनचा वाद सुटल्याशिवाय महाराष्ट्रात क्षमता वाढीचे प्रयत्न शक्य नव्हते. २००४ साली केंद्रात संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार आल्यानंतर पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी पुढाकार घेऊन प्रणव मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ कार्यगटाची स्थापना केली. यात सदस्य म्हणून शरद पवार यांनी पुढाकार घेतला. त्यामुळेच एनटीपीसी आणि गेलच्या माध्यमातून रत्नागिरी गॅस प्रोजेक्ट प्रा. लि. या नावाने हा प्रकल्प सुरू झालेला आहे. त्यातून सध्या राज्याला ९०० मे. वॉ. वीज मिळत असून लवकरच संपूर्ण १९५० मे. वॉ. मिळू लागेल अशी आशा आहे.

विजेच्या प्रश्नावर राजकारण झाले नसते तर आजचे प्रश्न निर्माण झाले नसते. एन्रॉन गेले. युतीचे राज्यही भारनियमन आपल्या माथी मारून गेले. आघाडी सरकारने मात्र व्यवहार्य तोडगा काढून हा प्रकल्प मार्गी लावण्यात यश मिळविले.

## बदलाचा बिगुल

राज्याच्या वीजक्षेत्राला असे एन्रॉनचे ग्रहण लागले असतानाच सन २००० च्या सुमारास विद्युत मंडळांचे मक्तेदारी



स्वरूप नष्ट करून विजेच्या क्षेत्रात स्पर्धा यावी असा आग्रह देशाच्या पातळीवर सुरू झाला. यातूनच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कामात सुधारणा सुचविण्यासाठी राजाध्यक्ष समिती, हैद्राबाद प्रशासकीय विद्यापीठाचा अहवाल गोडबोले समितीचा अहवाल आणि श्वेतपत्रिका असे प्रयोग राज्यात झाले. देशात सगळीकडेच विद्युत मंडळांच्या पुनर्रचनेची चर्चा सुरू झाली. या मंथनातूनच केंद्राचा विद्युत अधिनियम - २००३ जन्माला आला. यानुसार विद्युत मंडळाचे विभाजन अपरिहार्य ठरले. राजस्थान, उत्तरप्रदेश आणि इतर राज्यांत विभाजनाच्या पुनर्रचनेस वीज कर्मचारी संघटनांचा विरोध होता. संघटना आंदोलने करीत होत्या. समाजातूनही विरोध होत होता. वीज मंडळ प्रशासन आणि महाराष्ट्र शासन कोंडीत सापडले होते. एकीकडे राज्य विद्युत मंडळाची पुनर्रचना करणे क्रमप्राप्त होते. कारण त्याशिवाय केंद्राच्या अखत्यारितील विद्युत वित्तीय महामंडळ, ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ हे कुठल्याही प्रकल्पासाठी अर्थसहाय्य देण्यास तयार नव्हते. इतर वित्तीय संस्थांनीही हात अखडलेलाच होता. तर दुसरीकडे पुनर्रचनेविरुद्ध आंदोलने चालू होती.

अशा प्रकारे पुनर्रचना अशक्यप्राय वाटत असतानाच सर्व संघटनांना, सर्व विरोधी पक्षांना, विचारवंतांना विश्वासात घेऊन पुनर्रचना राज्यातील जनतेच्या आणि सर्वांच्याच हिताची कशी आहे. हे पटवून देण्यात आघाडी शासन यशस्वी झाले. आणि ६ जून, २००५ रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची पुनर्रचना होऊन चार स्वतंत्र कंपन्या अस्तित्वात आल्या. वीज मंडळाची पुनर्रचना या ऐतिहासिक घटनेने राज्याच्या विद्युत क्षेत्राला आणि पर्यायाने राज्याच्या विकासाला एक नवी दिशा प्राप्त झाली. विजेच्या प्रश्नाची चर्चा आणि चिंता गेली काही वर्षे महाराष्ट्रातच नव्हे तर देशपातळीवर सुरू आहे. तथापि महाराष्ट्रासमोरील ही समस्या आता सुटू पाहते आहे. कारण पुनर्रचनेनंतर अस्तित्वात आलेल्या महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या कंपन्या अतिशय फोकसड् पद्धतीने कामाला लागलेल्या आहेत. या कंपन्यांनी गेल्या चार वर्षांत आपापल्या क्षेत्रात लक्षणीय अशी कामगिरी बजावली आहे.

## महावितरण

जनतेच्या रोज संपर्कात येणाऱ्या या कंपनीसमोर अनेक आव्हाने होती. साडेचार ते पाच हजार मे. वॉ. चे भारनियमन, ३५.२ टक्के अशी प्रचंड पारेषण व वितरण हानी, ८९.२ टक्के एवढी कमी वसुलीची कार्यक्षमता, जर्जर आणि अतिभारित यंत्रणा, सुमारे १०९५ कोटी रुपयांचा रोख तोटा आणि उदासीन

मनुष्यबळ अशी ती आव्हाने होती. या साऱ्या आव्हानांवर मात करून महाराष्ट्राच्या विद्युत क्षेत्राची ललाटरेषा बदलणारा कृती कार्यक्रम आघाडी शासनाच्या नेतृत्वाखाली महावितरणने आखला.

## पायाभूत आराखडा विकास कार्यक्रम :

विद्युत निर्मितीच्या क्षेत्रात गेली काही वर्षे जशी गुंतवणूक झालेली नव्हती तशी स्थिती वितरणाचीही होती. उभी केलली यंत्रणा ठराविक काळानंतर अद्ययावत करणे ही गरज असते. परंतु निधी अभावी उभी राहिलेली यंत्रणा अद्ययावत करण्यात अडचणी होत्या. यंत्रणा अतिभारीत झालेली होती. सध्या ही यंत्रणा सुमारे १० ते ११ हजार मे. वॉ विजेचे वहन करते. २०१२ पर्यंत या यंत्रणेत आणखी सुमारे १० हजार मे. वॉ. विजेची भर पडणार आहे. या वाढीव विजेचे आणि २०१२ नंतर आणखी वाढणाऱ्या विजेचे वहन करण्याची क्षमता वितरण यंत्रणेत निर्माण करण्यासाठी जुनी यंत्रणा मजबूत करण्याचे आणि नवीन यंत्रणा उभारण्याचे दिर्घकालीन नियोजन करण्यात आले. हे नियोजन करताना असलेल्या यंत्रणेचे सक्षमीकरण करून भविष्यातील गरजा लक्षात घेऊन अनेक वर्षे अडचण येणार नाही याची काळजी घेण्यात आलेली आहे. सध्या आपली वितरण यंत्रणा खालीलप्रमाणे आहे.

## सध्याची यंत्रणा

| क्र. | तपशील | आकडेवारी (कि.मी) |
|---|---|---|
| १. | कार्यान्वित ३३/११ किव्हो उपकेंद्रे आणि स्वीचींग स्टेशन्स | १८८९ |
| २. | वितरण रोहित्रे | २५६७९३ |
| ३. | एच.व्ही. फिडर्स | १०२४० |
| ४. | वीज वाहिन्या (सर्किट कि.मी) | |
| | अ. ३३ कि.व्हो. | २९५९२ |
| | ब. २२ कि.व्हो. | २२९३९ |
| | क. ११ कि.व्हो. | १८६८८८ |
| | ड. लघुदाब वाहिन्या | ४८९३३४ |
| ५. | परिवर्तित्र क्षमता | |
| | अ. ३३/११ किव्हो, ३३/२२ किव्हो २२/११ किव्हो क्षमता | १९१४२ एम.व्ही.ए. |
| | ब. ३३/०.४, २२/०.४, ११/०.४ डी. टी.सी. क्षमता | २८०५५ एम.व्ही.ए. |
| ६. | वार्षिक महसूल | २१२७८ |

एरव्ही महावितरणला दरवर्षी सुमारे २०० ते ३०० कोटी रुपयांची प्रणाली सुधारणांची कामे करायची सवय होती. परंतु आता येत्या २ वर्षात राज्यातील वितरण यंत्रणा सक्षम करण्यासाठी सुमारे ८९१९ कोटी रुपयांच्या पायाभूत आराखडा विकास कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. यात उपकेंद्राची उभारणी करणे, असलेल्या उपकेंद्रांची क्षमता वाढविणे, उच्च दाब व लघुदाब वाहिन्यांची उभारणी करणे, वितरण रोहित्रांची उभारणी करणे, खराब झालेले खांब बदलणे इत्यादी कामे मोठ्या प्रमाणात केली जाणार आहेत. या योजनेत होणारी कामे पुढीलप्रमाणे :

## पायाभूत कामांचा तपशील

| क्र. | तपशील | आकडेवारी (कि.मी) |
|---|---|---|
| १. | ३३/११ किव्हो उपकेंद्रे | ५६५ |
| | एकूण क्षमता वाढ | ३२७५ एम.व्ही.ए. |
| २. | २२/११ किव्हो उपकेंद्रे | ३० |
| | एकूण क्षमता वाढ | ३७५ एम.व्ही.ए. |
| ३. | सध्याच्या उपकेंद्राची क्षमता वाढ | ४६९ |
| | ही क्षमता वाढ | ११२६ एम.व्ही.ए. |
| ४. | वितरण रोहित्र | ६२८९१ |
| | एकूण क्षमता | ५५७५ एम.व्हीए. |
| ५. | गंजलेले पोल बदलणे | १८२९०४ |

१ मे १९६० रोजी स्थापन झाली तेव्हा पासून मार्च २००८ पर्यंत राज्यात ३३/११ किव्हो ची सुमारे १८०० उपकेंद्रे कार्यरत आहेत. या योजनेंतर्गत येत्या २ वर्षांत पूर्वी थोडी थोडकी नाही तर ५६५ उपकेंद्रे उभारली जाणार आहेत. यावरून या प्रकल्पात वितरण यंत्रणा सक्षम करण्याचे किती मोठे काम होणार आहे, हे स्पष्ट व्हावे. सध्या असलेली यंत्रणा आणि होणारी कामे याची तुलना वरील दोन तक्त्यांच्या आधारे केली तर येत्या दोन वर्षांत होणाऱ्या प्रचंड कामांची कल्पना आपल्याला येत. याबाबतच्या ११९ प्रकल्पांपैकी सुमारे ८ हजार ७३९ कोटी रूपयांच्या प्रकल्पांच्या कामांचे आदेश देण्यात आलेले आहेत. इतर प्रकल्पांच्या निविदा अंतिम टप्प्यात असून लवकरच तेही आदेश देण्यात येत आहेत.

## गतिमान विद्युत विकास व सुधारणा कार्यक्रम (एपीडीआरपी)

केंद्र शासनाने गतिमान विद्युत व सुधारणा कार्यक्रमांतर्गत (एपीडीआरपी) टप्पा- १ मध्ये ११३६.५४ कोटी रूपयांच्या ११ जिल्ह्यांच्या व ९ शहरांच्या योजनांना मंजुरी दिली होती.

केंद्र शासनाच्या निर्देशनानुसार सर्व योजना दि. ३१-३-२००९ ला पूर्ण करण्यात आल्या. त्यावर एकूण १२०७.३१ कोटी रूपये खर्च करण्यात आला.

याशिवाय पुनर्रचित गतिमान विद्युत विकास व सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील १०७ शहरांसाठीच्या सुमारे १६२ कोटी रूपयांच्या योजना केंद्र शासनाने मंजूर केल्या असून त्यांचीही कामे लवकरच हाती घेण्यात येणार आहेत.

या कार्यक्रमांतर्गत वितरण यंत्रणा सक्षम करून वितरण हानी कमी करण्याच्या दृष्टिने प्रणाली सुधारणेची कामे करण्यात येतात. नवीन उपकेंद्रे, वाहिन्या, रोहित्रे यांची उभारणी करून कृषीपंप तसेच अन्य ग्राहकांसाठी मोठ्या प्रमाणावर मीटर लावण्याचा कार्यक्रम राबविण्यात येतो. त्यानुसार झालेल्या कामाचा तपशील असा :

## एपीडीआरपीमधील कामाचा तपशील

| कामे | तपशील |
|---|---|
| ३३ कि.व्हो. उपकेंद्रे (संख्या) | ६९ |
| ३३ कि.व्हो. वाहिन्या (किमी.) | ८२४ |
| ११ कि.व्हो. वाहिन्या (कि.मी) | ४६५३ |
| लघुदाब वाहिन्या (कि.मी.) | १०३५ |
| नवीन रोहित्रे (संख्या) | ७२७० |
| रोहित्रांवर लावलेले मीटर (संख्या) | २८३३१ |
| सिंगल फेज मीटर संख्या | ११४९६३५ |
| तीन फेज मीटर (संख्या) | ६५४६२ |
| कृषी पंप मीटर (संख्या) | ३१४३८५ |

## भारव्यवस्थापन : सिंगल फेजिंग व स्वतंत्र गावठाण फिडर योजना

वीजनिर्मिती प्रकल्पांचे नियोजन, उभारणी आणि कार्यान्वयन या प्रक्रियेस किमान ५ वर्षांचा कालावधी लागतो. दरम्यान विजेची मागणी दिवसागणिक वाढत असते. वीज मुबलक प्रमाणात उपलब्ध होईपर्यंत भारनियमन आटोक्यात ठेवण्यासाठी मागणीचे व्यवस्थापन करणे अत्यंत गरजेचे असते. अशा परिस्थितीत भार व्यवस्थापन करून भारनियमन आटोक्यात ठेवण्यासाठी महावितरणे २००५ पासून टप्प्याटप्याने सिंगल फेजिंग आणि स्वतंत्र गावठाण फिडर या महत्वाकांक्षी योजना हाती घेतलेल्या आहेत. सिंगल फेजिंग टप्पा - १ मध्ये ८०८५ तर टप्पा - २ मध्ये ३८७७ गावे यांचे उद्दिष्ट होते. ते उद्दिष्ट गाठण्यात आलेले आहे. टप्पा-३ मध्ये १५३६ गावांचे उद्दिष्ट



असून मे २००९ अखेरपर्यंत ८७५ गावांमध्ये सिंगल फेजिंगची कामे झालेली आहेत. याशिवाय या टप्प्यात १३३४ वाड्यांचाही समावेश असून त्यापैकी ६२९ वाड्यांना योजनेचा लाभ मिळालेला आहे. स्वतंत्र गावठाण फिडर योजनेच्या टप्पा - १ अंतर्गत ७४३७ गावांचे उद्दिष्ट असून त्यापैकी ५२१७ गावे लाभान्वित झालेली आहेत. ८४९१ गावांच्या टप्पा - २ ची कामे प्रगतीपथावर असून ६९३ गावांमध्ये कामे पूर्ण झालेली आहेत. या टप्प्यात २०२० वाड्यांचाही समावेश करण्यात आलेला आहे. योजनेच्या टप्पा - ३ मध्ये ३८१ गावे आणि ११०९ वाड्या यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे. राज्यात एकूण ४१०९५५ गावे आहेत. त्यापैकी कृषिबहुल अशा सुमारे २९,८०७ गावांत ह्या योजना राबविण्यात येत असून मे-२००९ अखेरपर्यंत १८,९४७ गावे लाभान्वित झाली आहेत. शिवाय ६२९ वाड्यांनाही लाभ झालेला आहे. एरव्ही गावात ११ ते १३ तास भारनियमन होते. परंतु या योजना राबविलेल्या गावांतील भारनियमन शहरांच्या पातळीवर म्हणजे पावणे दोन ते साडेपाच तासांवर आलेले आहे. उर्वरीत कामे प्रगतीपधावर असून लवकरच ती पूर्ण होतील. या दोन्ही योजनांचा खर्च सुमारे ३२३३ कोटी

रूपये एवढा प्रचंड आहे.

सिंगल फेजिंग व स्वतंत्र गावठाण फिडर योजनांच्या मे-२००९ अखेरच्या प्रगतीचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे.

## सिंगल फेजिंग व स्वतंत्र गावठाण फिडर योजना

| योजना | खर्च (रु. कोटीत) | लाभार्थी गावे | |
|---|---|---|---|
| सिंगल फेजिंग-१ | २३५ | ८०८५ | ८०८५ |
| सिंगल फेजिंग-२ | २२१ | ३८७७ | ३८७७ |
| सिंगल फेजिंग-३ | २०५ | १५३६ | ८७५ |
| सिंगल फेजिंग-एकूण | ६६१ | १३४९८ | १२८३७ |
| गावठाण फिडर-१ | ९४३ | ७४३७ | ५३१७ |
| गावठाण फिडर-२ | १४४६ | ८४९१ | ६९३ |
| गावठाण फिडर-३ | १८३ | ३८१ | -- |
| गावठाण फिडर एकूण | २५७२ | १६३०९ | ६०१० |
| एकूण | ३२३३ | २९८०७ | १८८४७ |

## भारनियमनात चार वेळा घट

डिसेंबर २००८ पासून जून २००९ या ६-७ महिन्याच्या कालावधीत भारनियमनात एकूण चार वेळा घट करण्यात आली. ग्रामीण भागातील भारनियमन ३ ते ३.३० तासांनी तर इतर भागातील भारनियमन १.३० तासाने कमी करण्यात आले. उद्योगांची आठवडी सुट्टी २४ तासांवरून १६ तासांवर आणण्यात आली.



## ग्रामीण भागातील घटलेले भारनियमन

| वर्गवारी | डिसेंबर २००८ तास | १४.०१.०९ तास | ३.०४.०९ तास | १३.०६०९ तास |
|---|---|---|---|---|
| अ | ११ | १०.०० | ८.३० | ७.३० |
| ब | ११.३० | १०.३० | ९.०० | ८.०० |
| क | १२.०० | ११.०० | ९.३० | ८.३० |
| ड | १२.३० | ११.३० | १०.०० | ९.०० |
| इ | १३.०० | १२.०० | १०.३० | ९.३० |
| फ | १३.०० | १२.०० | ११.०० | १०.०० |

दिनांक २४-५-२००९ पासून सिंगल फेजिंग व गावठाण फिडरची कामे झालेल्या भागातील कृषीपंपांनी ८ ऐवजी १० तास वीजपुरवठा सुरू करण्यात आला.

## इतर भागातील घटलेले भारनियमन

| वर्गवारी | डिसेंबर २००८ तास | १४.०१.०९ तास | ३.०४.०९ तास | १३.०६०९ तास |
|---|---|---|---|---|
| अ. | ३.१५ | २.४५ | २.०० | १.४५ |
| ब. | ४.०० | ३.३० | २.४५ | २.३० |
| क. | ४.४५ | ४.१५ | ३.३० | ३.१५ |
| ड. | ५.३० | ५.०० | ४.१५ | ४.०० |
| इ | ६.१५ | ५.४५ | ५.०० | ४.३० |
| फ | ७.०० | ६.३० | ५.४५ | ५.३० |

विजेची मागणी दिवसागणिक वाढत असते. कारण दिवसागणिक ग्राहकसंख्येत नव्याने भर पडत असते. विजेचा तुटवडा असला तरी नवीन जोडण्या देण्याचे थांबत नाही. तसे थांबवता येत नाही. जुन्या ग्राहकांचा वीज वापर वाढत असतो आणि नव्या ग्राहकांची भर पडत असते. ही प्रक्रिया सतत सुरू असते. महावितरणच्या ग्राहक संख्येत दरवर्षी कशी कशी भर पडत गेली हे खालील तक्त्यावरून स्पष्ट होईल.

## वाढत जाणारी ग्राहक संख्या

| वर्ष | ग्राहक संख्या | पडलेली भर (संख्या) |
|---|---|---|
| २००४-०५ | १३६५६१८३ | १२३७८५ |
| २००५-०६ | १३९१७१७५ | २६०९९२ |
| २००६-०७ | १४६५५२५० | ७३८०७५ |
| २००७-०८ | १५६९६१७२ | १०४०९२२ |
| २००८-०९ | १६८०२५०२ | ११६३३० |

पूर्वी दरवर्षी लाख-सव्वा लाखाने वाढणारी ग्राहक संख्या आता १० लाखांनी वाढते आहे, हे वरील तक्त्यावरून स्पष्ट होते. अर्थात विजेची मागणी अतिशय वेगाने वाढत आहे. विजेची उपलब्धता वाढविण्यासोबतच सिंगल फेजिंग व स्वतंत्र गावठाण फिडर या योजनांमुळे विजेची मागणी नियंत्रणात ठेवण्यात फार मोठे यश मिळालेले आहे.

## विजेची मागणी, उपलब्धता आणि तूट यांची मागील ४ वर्षातील स्थिती

| वर्ष | ०६-०७ मे.वॉ. | ०७-०८ मे.वॉ. | ०८-०९ मे.वॉ. | ०९-१० मे.वॉ ३ जुलै ०९ |
|---|---|---|---|---|
| मागणी | १४८२५ | १५६८९ | १५६५६ | १५३०४ |
| उपलब्धता | १०२९८ | १०४१२ | १०७१५ | १११७९ |
| तूट | ४५२७ | ५२७७ | ४९४१ | ४१२५ |

महानिर्मितीने हाती घेतलेले क्षमता वाढीचे प्रकल्प आणि महावितरणला अन्य स्त्रोतांकडून मिळणारी वीज यातून २०१२ पर्यंत राज्य भारनियमनमुक्त होईल असे नियोजन करण्यात आलेले आहे.

## वितरण हानीत घट

महावितरण राज्यातील तब्बल १ कोटी ७० लाख ग्राहकांना वीजपुरवठा करते. आणि कंपनीचा वार्षिक महसूल सुमारे २१ हजार २७८ कोटींच्या घरात आहे. ७५ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांमुळेच महावितरणला यशाचा हा पल्ला गाठता आलेला आहे. महावितरणचे आणि काही लाख रोहित्रे अशी ही यंत्रणा आहे.

महावितरणने पुनर्रचनेनंतर अवघ्या ४ वर्षांत आपली वितरण हानी ३५ टक्के वरून २२.२ टक्क्यांवर आणली आहे. वसुलीची कार्यक्षमता ८९ टक्के वर नेली. मासिक महसूल ११०० कोटींवरून १६०० कोटींवर जाऊन पोहचला.

## पुनर्रचनेनंतर वितरण हानीत झालेली घट

| वर्ष | वितरण हानी (%) |
|---|---|
| २००४-०५ | ३४.८८ |
| २००५-०६ | ३१.७२ |
| २००६-०७ | २९.५० |
| २००७-०८ | २४.०९ |
| २००८-०९ | २२.२ |



## वीजचोरीविरुद्ध मोहिम व स्वतंत्र पोलीस ठाणी

कंपनीसमोर असलेली सर्वात गंभीर समस्या म्हणजे वीजचोरी. या समस्येवर मात करण्यासाठी वीजचोरीविरुद्ध सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. वीजचोरीची प्रकरणे जलद गतीने हाताळण्यासाठी कल्याण, नागपूर, लातूर, जालना आणि नाशिक या सहा ठिकाणी स्वतंत्र पोलीस ठाण्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. भारतीय पोलीस दलातील वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

## वीजचोरीविरोधी मोहिमेची माहिती

| क्र. | वर्ष | घातलेल्या धाडी | पकडलेल्या वीज चोऱ्या | दाखल गुन्हे | वसूल दंड कोटी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २००५-०६ | १६०८२८ | ५६५६९ | ८१२३ | ३५.१९ |
| २. | २००६-०७ | २२५२६२ | ५९७९७ | १०१६२ | ३८.७७ |
| ३. | २००७-०८ | ४७६९८३ | ८९८८० | ९४११ | ५५.४२ |
| ४. | २००८-०९ | ९९००९२ | ५७०६५ | ४८६४ | ४४.४८ |

## सामाजिक बांधिलकी

महावितरण ही कंपनी राज्याच्या विकासासाठी कटीबद्ध आहे. आपण ही जबाबदारी पार पाडीत असतांना समाजातील गरजू ग्राहक वर्गांना मदतीचा हात देण्याची सामाजिक जबाबदारीची जाणीव कंपनीने सातत्याने ठेवलेली आहे. महावितरणने आणि महाराष्ट्र शासनाने राज्यातील शेतकरी, यंत्रमागधारक, ग्रामीण पाणी पुरवठा योजना यांच्यासाठी सवलतीच्या, अनुदानाच्या अनेक योजना राबविल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे :

## कृषी संजीवनी योजना :

शेतकऱ्यांवरील विद्युत बिलाच्या थकबाकीचा बोजा कमी करण्यासाठी एप्रिल २००४ ते मार्च २००५ या कालावधीत ही योजना राबविण्यात आली. या योजनेत वीज बिलांतील मूळ थकबाकीच्या ५० टक्के रक्कम भरल्यास उरलेली थकबाकी, व्याज व दंड माफ करण्याची सोय होती. या योजनेचा ९ लाख ७३ हजार ३३६ शेतकरी बांधवांनी लाभ घेतला. यामुळे शासनाला ६६४.१३ कोटी आणि रूपयांचा बोजा उचलावा लागला.

## यंत्रमाग संजीवनी योजना :

यंत्रमाग ग्राहकांवरील थकबाकीचा बोजा कमी करणे व यंत्रमाग उद्योगाला चालना देणे यासाठी ही योजना राबविण्यात आली. या योजनेसाठी थकबाकीतील मूळ रकमेच्या ५० टक्के रक्कम भरल्यास कृषी संजीवनी योजनेप्रमाणेच उरलेली थकबाकी, व्याज व विलंब शुल्क माफ करण्याची तरतूद यात होती. ही योजना २००४ मध्ये राबविण्यात आली. या योजनेमुळे शासनावर २६.८५ कोटी व महावितरण कंपनीला ८.१५ कोटी एवढा बोजा सहन करावा लागला. याशिवाय यंत्रमाग धारकांसाठीही सवलतीचे दर लागू करण्यात आलेले आहेत.

## सार्वजनिक नळपाणी पुरवठा संजीवनी योजना :

ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद व नगरपालिका यांच्या नळपाणी पुरवठा योजनांच्या मूळ थकबाकीपैकी ५० टक्के जुलै २००४ पासून १० समान मासिक हप्त्यांत भरणा केल्यास तसेच चालू वीज देयकाची रक्कम नियमितपणे भरल्यास त्यांना सदर योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या सवलतीचा लाभ मिळणार होता.

मूळ थकबाकीच्या ५० टक्के रक्कम हप्त्याहप्त्याने भरल्यानंतर उर्वरित रक्कम माफ करण्यात येणार होती. उर्वरित ५० टक्के रक्कम व थकबाकीच्या व्याजापोटी ५० टक्के रक्कम शासनातर्फे विद्युत मंडळास कर्जाच्या समायोजनाद्वारे अदा करावयाची होती. विद्युत मंडळाकडून ५० टक्के व्याजाची रक्कम व संपूर्ण विलंब आकार माफ करण्यात आला होता. या योजनेत ६,०७० नळपाणी पुरवठा ग्राहकांनी भाग घेतला. यामुळे शाासनावर सुमारे २० कोटी ६० लाख व महावितरणवर ९ कोटी ९३ लाख एवढा आर्थिक बोजा पडला.

## कृषीपंपांना मोफत वीज :

१ जुलै २००४ ते ३१ मे २००५ या काळात आघाडी सरकारने शेतकरी बांधवांच्या कृषीपंपांसाठी मोफत वीज दिली. यापोटी शासनावर रू. १२१२ कोटी एवढा बोजा पडला. २००४ साली निवडणुका जाहीर झाल्या तेव्हा विरोधकांनी कृषीपंपांना मोफत वीज देण्याची घोषणा केली. जशास तसे उत्तर देण्यासाठी आघाडी सरकारने नुसतीच घोषणा दिली नाही तर ती घोषणा प्रत्यक्ष अंमलातही आणली.

महाराष्ट्र शासनाने शेतकरी बांधव व यंत्रमागधारकांना वीज बिलांत दिलेल्या सवलतीपोटी २००२-०३ पासून २००८-०९ पर्यंत १०६९० कोटी रूपये शेतकरी बांधव व यंत्रमागधारकांच्या वतीने महावितरणला दिले आहेत.

## शासनाकडून शेतकरी व यंत्रमागधारक यांना वीजदरात सवलती.

राज्यातील शेतकरी व यंत्रमागधारक यांना वीजदरात भरघोस सवलती देण्याचे धोरण शासनाने सातत्याने राबविले आहे. वीजेचे दर विद्युत नियामक आयोगाद्वारे ठरविले जातात. मुळात कृषि व यंत्रमागधारकांचे आयोगाने ठरविलेले दर अन्य ग्राहकांच्या तुलनेने कमी असतात. त्यात पुन्हा शासनाने अनुदान देऊन ते आणखी कमी केलेले आहेत. विशेष म्हणजे हे दर वर्षानुवर्षे स्थिर आहेत. त्यांत कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. या दोन घटकांच्या वीजदरांचा तपशील खालीलप्रमाणे :

### कृषिपंपासाठी दर :

| अश्वशक्तीप्रमाणे वीजवापर | आयोगाचा | प्रत्यक्ष सवल- |
|---|---|---|
| वीजवापर ३ अश्वशक्तीपर्यंत प्रति अश्व/प्रतिवर्ष | आकार रु. | -तीचा दर |
| श्रेणी - अ | २१६० | ५०० |
| श्रेणी - ब | १८०० | ५०० |
| ३ ते ५ अश्वशक्तीपर्यंत | | |
| श्रेणी अ | २१६० | ७०० |
| श्रेणी ब | १८०० | ७०० |
| ५ अश्वशक्तीपेक्षा जास्त | | |
| श्रेणी अ | २१६० | ९०० |
| श्रेणी ब | १८०० | ९०० |

(श्रेणी - अ मध्ये भांडूप, पुणे आणि नाशिक या परिमंडळांचा समावेश होतो. तर श्रेणी ब मध्ये अमरावती, औरंगाबाद, कल्याण, कोकण, कोल्हापूर, लातूर नागपूर शहर आणि नागपूर या परिमंडळांचा समावेश होतो.

**मीटरप्रमाणे वीज वापर प्रति युनिट**

| | आयोगाचा दर | सवलतीचा दर |
|---|---|---|
| ३ अश्वशक्तीपर्यंत | ११० पैसे | २० पैसे |
| ३ अध्वशक्तीपेक्षा जास्त | ११० पैसे | ५० पैसे |

**यंत्रमागधारकासाठी दर**

| | आयोगाचा वीज आकार (प्र.यु.) | सवलतीचा दर वीज आकार (प्र.यु.) |
|---|---|---|
| २७ अश्वशक्तीपर्यंत | ३०० पैसे | ५० टक्के |
| २७ अश्वशक्तीच्यावर | ४५० पैसे | ६६.६६ टक्के |

**आयोगाचे दर आणि प्रत्यक्षातील सवलतीचे दर यातील फरकाची रक्कम शासनाने वेळोवेळी सबसिडी म्हणून महावितरणला दिलेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे**

वर्गवारी (सबसिडी रु. कोटीमध्ये)

| क्र. | वर्ष | कृषीपंपधारक | यंत्रमागधारक | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | २०००-०१ | २६३.७८ | ९४.३८ | ३५८.१६ |
| २. | २००१-०२ | ३१२.३७ | १०८.१६ | ४२०.५३ |
| ३. | २००२-०३ | ५८९.४५ | ११.९७ | ७०६.४२ |
| ४. | २००३-०४ | ७२३.३९ | १५८.१२ | ८८१.५१ |
| ५. | २००४-०५ | १२९४.८३ | १९६.१२ | १४९०.९५ |
| ६. | २००५-०६ | १३०८.७३ | ३३२.८८ | १६४१.६१ |
| ७. | २००६-०७ | १२२९.०५ | ४८३.९१ | १७१२.९६ |
| ८. | २००७-०८ | १३०४.९५ | ४७१.३५ | १७७६.३ |
| ९. | २००८-०९ | १६०२.३८ | २७९.५८ | १८८१-१६ |
| १० | २००९-१० | १३८०.८३ प्रस्तावित | ४७८.६१ प्रस्तावित | १८५९.४४ |
| एकूण | | ९८११.८२ | २८६१.७३ | १२६७३.५५ |

## राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना

ग्रामीण भागातील विजेच्या पायाभूत सुविधांचा विस्तार करून घरकुलांच्या विद्युतीकरणात वाढ करण्यासाठी केंद्र सरकारने मार्च २००५ साली राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना सुरू केली. २००१ च्या जनगणनेनुसार आणि विद्युतीकरणाच्या नव्या 'व्याख्येनुसार सर्व गावांचे विद्युतीकरण करण्याचे उद्दिष्ट या योजनेत आहे. दारिद्र्य रेषेखालील सर्व कुटुंबांना वीज जोडणी मोफत देण्याचे लक्ष्य या योजनेत निर्धारीत करण्यात आले आहे. या योजनेत दारिद्र्य रेषेखालील १८ लाख ७२ हजार ८६५ घरकुलांना सप्टेंबर २०१० पर्यंत वीज देण्याचे लक्ष्य ठरविण्यात आले आहे. यासाठी सुमारे ७१४ कोटी रपयांचा खर्च अपेक्षित असून यात ९३१० वितरण रोहित्रांची उभारणी व कित्येक किलोमीटर उच्चदाब व लघुदाब वाहिन्यांची उभारणी केली जाणार आहे.

## राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेतील कामे

| क्र. | जिल्हा | योजनेचा खर्च | दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी घरकुलांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | रायगड | २०.७१ | ९७९७९ |
| २. | अहमदनगर | ३९.२४ | ९४९११ |
| ३. | सिंधुदुर्ग | ६.५० | ५४८६ |
| ४. | ठाणे | ३०.१८ | ४४६३३ |
| ५. | नाशिक | ३५.६० | ९३०९७ |
| ६. | जळगाव | ३०.५१ | १०५७९८ |
| ७. | कोल्हापूर | ९.५२ | ७४६१ |
| ८. | परभणी | १८.३३ | ५५४६७ |
| ९. | हिंगोली | ७.९७ | १५१३३ |
| १०. | बीड | १८.७० | ५५५५२ |
| ११. | उस्मानाबाद | १५.७२ | ३४१७३ |
| १२. | लातूर | २४.२१ | ५७६१६ |
| १३. | बुलढाणा | ३८.९२ | ११०१२० |
| १४. | वाशिम | ९.९४ | ६२२०२ |
| १५. | चंद्रपूर | २०.६५ | २१२७२ |
| १६. | गडचिरोली | १४.५६ | ३९२१७ |
| १७. | रत्नागिरी | १३.८६ | २६८६९ |
| १८. | धुळे | १८.१७ | ८०७४६ |
| १९. | नंदूरबार | ३०.७२ | ९६३९४ |
| २०. | पुणे | ३१.६६ | ५२९८४ |
| २१. | सातारा | १५.३० | २०४०४ |
| २२. | सांगली | १४.४२ | ४३४३१ |
| २३. | सोलापूर | २७.३७ | ६६४१७ |
| २४. | औरंगाबाद | २३.१४ | ५८५३३ |
| २५. | जालना | १६.५३ | ४३०२० |
| २६. | नांदेड | १३.६० | २३९०१ |
| २७. | अकोला | २०.७२ | ७५१३८ |
| २८. | अमरावती | ३१.७६ | ८७०६४ |
| २९. | यवतमाळ | २५.१८ | ७८७०५ |
| ३० | वर्धा | १९.०६ | ४३९९७ |
| ३१ | नागपूर | २९.२४ | ६०००० |
| ३२ | भंडारा | २१.७४ | ६८९८१ |
| ३३. | गोंदिया | १९.७२ | ९१४७४ |
| | एकूण | ७१३.४५ | १८७२८५६ |

आतापर्यंत सुमारे ४ लाख घरकुलांना वीजपुरवठा करण्यात आलेला असून उर्वरित सर्व कामे प्रगतीपथावर आहेत.

## महापारेषण

येत्या ४-५ वर्षांत किमान १० हजार मे.वॉ. पेक्षा जादा वीज राज्यात उपलब्ध होण्याची शक्यता आहे. या विजेचे व्यवस्थितपणे पारेषण व्हावे यासाठी सक्षम पारेषण यंत्रणा उभा राहणे गरजेचे आहे. सध्या सुमारे १५ हजार मे. वॉ. वीज हाताळण्याची क्षमता महापारेषण कंपनीची असून त्यासाठी ४९८ अतिउच्च दाब उपकेंद्रे व ६१५३० एमव्हीए एवढी रोहित्र क्षमता व ३६,२८७ सर्किट कि.मी. अति उच्च दाब वाहिन्या अशी यंत्रणा उपलब्ध आहे. ही यंत्रणा गेल्या ५०-६० वर्षांत उभी केलेली आहे.



भविष्याची वाढती गरज लक्षात घेता महापारेषण कंपनी २०१२ पर्यंत अतिउच्च दाबाची १२६ उपकेंद्रे उभारणार आहे. यातील २१ उपकेंद्रे कार्यान्वितही झालेली आहेत. याच काळात १७५३३ सर्किट कि. मी. लांबीच्या नवीन अति उच्च दाब वाहिन्या उभारण्याचे काम कंपनीने सुरू केलेले आहे. याशिवाय रोहित्रांची क्षमता थोडी थोडकी नाही तर ५३,८८७ एमव्हीएने वाढणार आहे. म्हणजे गेल्या ५०-६० वर्षांत ६१५३० एमव्हीए क्षमता उभी राहिली आणि आता केवळ ५ वर्षांत ५३,८८७ एमव्हीए एवढी प्रचंड क्षमता उभी राहणार आहे. यासाठी सुमारे २० हजार कोटी रूपयांची गुंतवणूक होत आहे.

## महानिर्मितीची गेल्या ४ वर्षांतील कामगिरी

६ जून २००५ रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची पुनर्रचना होऊन महानिर्मिती कंपनी अस्तित्वात आली. वीज निर्मिती क्षेत्रात आगामी काळातील खासगी व अन्य कंपन्यांची स्पर्धा लक्षात घेऊन तातडीने दोन पातळीवर नियोजन करणे आवश्यक होते. पहिल्या पातळीवर लघुकालीन नियोजन नुसार सध्याच्या स्थापित क्षमतेचा पुरेपुर कार्यक्षमतेने वापर करून कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त वीज निर्मितीसाठी प्रयत्नशील राहणे यावर भर देण्यात आला.

तसेच दुसऱ्या पातळीवर मध्यमकालीन-दीर्घकालीन नियोजन नुसार आगामी काळातील वीज निर्मिती क्षमता वाढविण्यासाठी विविध प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले. ज्या प्रमाणात लक्षणीय वाढ होत आहे ते लक्षात घेता निदान आगामी ४-५ वर्षांत ही वाढीव स्थापित क्षमता कार्यान्वित व्हावी, अशा योजनाबद्ध दृष्टीकोनातून प्रकल्प नियोजन व तदसंबंधित कार्यवाही झपाट्याने सुरू करण्यात आली. प्रकल्पपूर्तीसाठी लागणारा कमीत कमी ४ ते ५ वर्षांचा कालावधी लक्षात घेऊन या प्रकल्पांसाठी जमीन संपादन करणे, पाणी, वाहतूक व्यवस्था, कच्चा कोळसा पुरवठा, व पर्यावरणाच्या दृष्टीने विविध परवाने मिळविणे इत्यादी कामे झपाट्याने पूर्णत्वास नेण्यात आली.

१) विजेची वाढती मागणी घेऊन सध्याची औष्णिक स्थापित क्षमता जवळपास दुपटीने वाढविण्यासाठी सुमारे ६३८० मेगावॅट क्षमतेचे वीज प्रकल्प उभारणीचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले, त्यानुसार १-११-२००७ पासून परळी येथील संच क्र. ६ (२५० मेगावॅट), तसेच परळी येथील (२५० मेगावॅट) क्षमतेचे संच क्र. ७ व ८, पारस येथील (२५० मेगावॅट) संच क्र. ४ या सर्व संचांचे उभारणीचे काम वेगाने पूर्णत्वाकडे जात आहे. हे सर्व प्रकल्प टप्प्याटप्याने आगामी काळात कार्यान्वित होणार आहेत.

२) वीजनिर्मिती केंद्रांचे पारंपारिक संचलन व संचाच्या कार्यपद्धतीत शिस्तबद्ध बदल घडवून आणण्यात आले. त्यानुसार संचाच्या वार्षिक देखभालीच्या कामात अधिक सुसूत्रता आणण्यात आली. वार्षिक देखभालीच्या कामाचा गुणात्मक दर्जा राखून सदरहू काम आता ३० दिवस ऐवजी २५ दिवसात करण्यात येते. तसेच कॅपिटल ओव्हर ऑलचे काम ४५ दिवसांऐवजी आता ३५ दिवसात करण्यात येते.

३) बॉयलर ट्युब लिकेजचे प्रमाण कमीत कमी

करण्यासाठी विशेष कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. यासाठी भेल या कंपनीच्या मार्गदर्शनानुसार विविध उपाययोजना करण्यात आल्या, त्यामुळे ट्युब लिकेजचे प्रमाण पूर्वीच्या ३.८९ टक्क्यांवरून आता, २.९६ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले व त्यामुळे संचांची उपलब्धता सन २००६-०७ मधील ८१.११ टक्क्यांवरून सन २००७-०८ टक्के झाली.

४) वर्ष २००७-०८ मध्ये महानिर्मितीच्या औष्णिक वीज निर्मिती संचांनी वीजनिर्मितीचे (दशलक्ष युनिटस्) अनेक उच्चांक प्रस्थापित केले होते. याही वर्षी महानिर्मितीच्या औष्णिक वीज संचांची उपलब्धता वाढलेली असून बॉयलर ट्युब लिकेजचे प्रमाणही गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी आहे, ही वस्तुस्थिती आहे. (गतवर्षीची उपलब्धता ८७.५८ टक्के व यावर्षीची उपलब्धता ८८.४ टक्के इतकी आहे. तसेच बॉयलर ट्युब लिकेजचे प्रमाण गतवर्षीच्या २.९४ टक्के वरून यावर्षी २.४१ इतके खाली आणण्यात आले आहे.) वीजनिर्मिती संच बंद पडण्याचे प्रमाण गतवर्षीच्या ४.३६ टक्के वरून यावर्षी ४.०८ टक्के इतके खाली आणण्यात आले आहे. त्यातही बॉयलर ट्युब लिकेजचे प्रमाण हे जास्तीत जास्त जुन्या औष्णिक संचांचे आहे, ही बाब येथे आवर्जून लक्षात घेण्यासारखी आहे.

५) महानिर्मिती केंद्रांनी पुरेसा व दर्जेदार कोळसा मिळविण्यासाठी विविध कोळसा उत्पादक कंपन्यांशी करार करण्यात आले. यापूर्वी बहुतांशी कोळसा फक्त वेस्टर्न कोल फिल्डस कंपनीकडून उपलब्ध होत होता, आता साऊथ इस्टर्न कोल फिल्ड, महानदी कोल्ड फिल्ड व सिंगारांनी कोल कंपनी इ. कडून दर्जेदार कोळसा मिळविण्यासाठी सातत्याने पाठपुरवठा करण्यात आला. तसेच काही प्रमाणात धुतलेला व आयात केलेला कोळसा वापरण्याचे तंत्र वापरल्याने अनेक संचांची भारक्षमता वाढण्यास मदत झाली. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे महा निर्मिती कंपनीच्या अनेक जुन्या केंद्रांनी वीज निर्मितीतील आजवरची सर्वोच्च विक्रमी कामगिरी नोंदविली आहे.

६) सन २००७-०८ या वर्षात महानिर्मितीच्या औष्णिक वीज संचाद्वारे एकत्रितपणे आजवरचा सर्वोच्च ७६.९९ टक्के इतका विक्रमी भारांक (पी.एल.एफ) नोंदविण्यात आला आहे. गतवर्षाच्या तुलनेत या वर्षी २६९७ दशलक्ष युनिटस इतकी जास्त वीजनिर्मिती महानिर्मितीने साध्य केली आहे.

७) उरण वायू विद्युत केंद्रातून इंधन वायू कमतरतेमुळे उपलब्ध क्षमतेनुसार वीज निर्मिती होऊ शकत नव्हती. या केंद्राला अतिरिक्त वायू पुरवठा होऊन जास्तीत जास्त वीजनिर्मिती



व्हावी यासाठी महानिर्मिती कंपनी तसेच राज्य शासनाने सातत्याने पाठपुरावा केला. पनवेल-उरण स्पर गॅस पाईप लाईनचे काम एप्रिल २००८ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे, त्यामुळे खुल्या बाजारातून पाईप लाईनचे काम एप्रिल २००८ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे, त्यामुळे खुल्या बाजारातून इंधन वायू उपलब्ध होण्यास मदत होऊन वीज निर्मितीत वाढ झाली आहे. दीर्घकालीन इंधन वायु पुरवठ्यासाठी नुकताच मे. रिलायन्सशी एक महत्वपूर्ण करार करण्यात आला आहे व त्यायोगे उरण येथे अतिरिक्त इंधन वायुचा पुरवठा होत आहे. उरण वीज केंद्रातून यावर्षी विक्रमी वीज उत्पादन शक्य झाले आहे.

८) वीज निर्मिती केंद्रातील संयंत्रांना लागणाऱ्या विजेचे प्रमाण कमी करण्यास लक्षणीय यश मिळाले आहे, त्यामुळे ग्रीड मध्ये अधिक वीज उपलब्ध होण्यास मदत झाली आहे.

९) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मुख्यालयातील मध्यवर्ती नियंत्रण कक्षाची यशस्वी उभारणी करण्यात कंपनीने यश मिळविले आहे. यायोगे महानिर्मितीची सर्व महत्वाची विद्युत केंद्रे या कक्षाला जोडण्यात आली आहेत.

१०) महानिर्मितीच्या जलविद्युत केंद्रातून गतवर्षी विक्रमी वीजनिर्मिती करण्यात आलेली आहे.

११) आगामी काळासाठी महानिर्मितीच्या वीज केंद्रांना दीर्घकालीन कोळशाची उपलब्धता रहावी व कोळशाच्या बाबतीत अंशतः का होईना स्वयंपूर्ण होण्यासाठी ओरिसातील मच्छकट्टा, चेंडीपाडा व राज्यातील भिवकुंड येथे कोळशाची खाण विकसित करण्याचे नियोजन केले आहे. कॅप्टिव्ह मायनिंग ही संकल्पना महाराष्ट्र राज्यात प्रथमच अंमलात आणण्यात येत आहे.

१२) महानिर्मितीच्या कोराडी, नाशिक तसेच परळी, भुसावळ, चंद्रपूर येथील २१० मेगावॅट क्षमतेच्या संचांचे नुतनीकरण व आधुनिकीकरण ११ व्या पंचवार्षिक योजनेत करण्यात येणार आह. सदरहू कामास जागतिक बँक व जर्मन फेडरल बँक यांचेकडून वित्त सहाय्य करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली आहे.

१३) रिप्लेसमेंट प्रकल्प नियोजनांतर्गत जुने व कमी क्षमतेचे संच बदलून त्याऐवजी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक क्षमतेचे संच त्याच उपलब्ध संसाधनांचा उपयोग करून उभारण्याचे टप्पानिहाय नियोजन केलेले आहे.

महानिर्मितीचे बहुतांशी वीजनिर्मिती संच हे देशातील सर्वात जुने संच आहेत. महानिर्मितीच्या बहुतांशी वीजनिर्मिती संचांचे आयुष्यमान हे साधारण २० वर्षांहूनही जास्त झालेले असल्याने त्यात अधूनमधून अनेक तांत्रिक समस्या उद्भवत असतात. परंतु, अशा समस्या उद्भवल्यानंतर युद्धपातळीवर विपरीत परिस्थितीतही तातडीने त्यांचे निराकरण कसे करता येईल, या दृष्टिकोनातून कंपनी नेहमीच प्रयत्नशील उपाययोजनांची आखणी व अंमलबजावणी यापूर्वीच सुरू केलेली आहे. महानिर्मितीच्या औष्णिक वीज संचांचे आयुष्यमान हे सध्या चंद्रपूर (२७ वर्षे), कोराडी (३७ वर्षे), पारस (४२ वर्षे), परळी (३७ वर्षे), नाशिक (३९ वषे४), खापरखेडा (२० वर्षे) व भुसावळ (४१ वर्षे) याप्रमाणे जास्त २५ वर्षे इतकेच असते. परंतु अशा परिस्थितीतही महानिर्मितीने कंपनीकरणानंतर या जुन्या संचाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी व त्यातील तांत्रिक बिघाडांचे प्रमाण कमी करण्यासाठी एक सुनियोजित कृती आराखडा आखला आहे. यासाठी महानिर्मिती सेंट्रल पॉवर रिसर्च इन्स्टिट्युट, एन.टी.पी.सी. अशा नामांकित राष्ट्रीय संस्थांकडूनही योग्य ते मार्गदर्शन घेत असून त्यानुरूप सूचनांची तातडीने अंमलबजावणी सुरू आहे.

सदर कृती आराखडा हा त्रिस्तरीय स्वरूपाचा आहे. यापैकी अल्पकालीन योजनांतर्गत चालू संचाची वीजनिर्मिती खंडीत न करता शक्य त्या दुरूस्तीची कामे करणे, वाफेची गळती–कोळसा गळती, कोलमिलची योग्य देखभाल यांसारख्या उपाययोजनांचा समावेश आहे.

मध्यमकालीन योजनांतर्गत विशेषतः कोळसा हाताळणी विभागातील कन्व्हेअर बेल्टस् व संबंधित संयंत्रे, गियर बॉक्स इत्यादींची दुरूस्ती वगैरे कामांचा समावेश आहे.

दीर्घकालीन योजनांतर्गत टर्बाईन, बॉयलर, जनरेटर यांची प्रमुख दुरूस्ती, कोळसा हाताळणी विभागातील वॅगन टिपलरचे



नूतनीकरण, क्रशर्स बदलणे, विविध विद्युत प्रणाली–ब्रेकर्स यांची दुरूस्ती तसेच वार्षिक देखभालीच्या अंतर्गत करण्यात येते.

आपल्या वीजनिर्मिती केंद्रांना पुरेसा व दर्जेदार कोळसा उपलब्ध व्हावा, या दृष्टिकोनातून कंपनी सातत्याने अथक प्रयत्नशील आहे. असा कोळसा उपलब्ध न झाल्यास सध्याच्या क्षमतेनुसार वीजनिर्मिती करण्यात अडचणी येतात. अनेकदा उपलब्ध कोळशाच्या दर्जानुसार चालू संचाच्या भारात विपरीत बदल होत असतात. शिवाय संचांच्या भारात वारंवार बदल झाल्यास बॉयलर ट्युब लिकेजची समस्या उद्भवण्याची शक्यता अधिक असते. उपलब्ध कोळशाचा जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे वापर करण्यासाठी कंपनी प्रयत्नशील आहे.

वीजनिर्मिती हे अखंड उत्पादन कार्य आहे. महानिर्मितीच्या कर्मचाऱ्यांना अनेकदा विपरीत परिस्थितीत तातडीची कामे करावी लागतात. पुर्नरचनेनंतर कंपनी समोरील विविध आव्हाने सक्षमपणे पेलण्यासाठी ऊर्जा क्षेत्रातील तज्ञसंस्थाच्या मार्गदर्शनाखाली महानिर्मितीचे तंत्रज्ञ व अधिकारी यांना योग्य प्रकारे प्रशिक्षित करण्यात येत आहे.

एकूणच वीजनिर्मितीतील सध्याची कमतरता लवकरात लवकर भरून काढून वीजनिर्मितीतीत जास्तीत जास्त वाढ करण्यासाठी महानिर्मिती कटीबद्ध आहे. एकीकडे जुन्या संचांमधून जास्तीत जास्त वीजनिर्मितीचे आव्हान पेलताना व कोळशाच्या उपलब्धतेनुसार जास्तीत जास्त वीजनिर्मितीसाठी महानिर्मितीचे अथक प्रयत्न सुरू आहेत. आगामी काळात वाढीव वीज निर्मितीतून त्याचे प्रत्यंतर लवकरच सर्वांना येईल.

■■■



# आरोग्य सेवेच्या क्षेत्रात आपण अद्याप मागासच...

**– खासदार सुप्रिया सुळे**



नव्या सहस्त्रकाची विकास उद्दिष्टे गाठायची तर आता आपल्याला देशांतर्गत आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासारख्या मुलभूत गोष्टींकडे प्राधान्याने लक्ष द्यावे लागणार आहे. त्यात आपण कमी पडलो तर सर्वंकष व सर्वांगीण प्रगती ही, या देशाला दूरच्या दिव्यासारखीच राहील...!

संयुक्त राष्ट्रसंघाचे सरचिटणीस आणि आमसभेचे अध्यक्ष यांनी सप्टेंबर २००८ मध्ये न्युयॉर्क येथे एका उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन केले होते. त्या बैठकीत नव्या सहस्त्रकातील विकासाच्या उद्दिष्टांशी (मिलेनियम डेव्हलपमेंट गोल्स) पुन्हा एकवार बांधीलकी व्यक्त करण्यात आली खरी, परंतु ती उद्दिष्टये साध्य करण्याची २००५ सालापर्यंतची मुदत संपण्याची वेळ जवळ आली असतांनाच आपल्यावर जागतिक आर्थिक मंदीचे संकट कोसळळे आहे आणि इंधन व अन्नधान्याचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. तसा साऱ्या जगाच्याच दृष्टीने हा मोठा कठीण काळ आहे. परंतु त्यामुळे भारतासारख्या जगातील एक चतुर्थांश गरीब नागरिक राहात असलेल्या देशातील राष्ट्रीय दारिद्रय निर्मुलन कार्यक्रम मात्र यापूर्वी कधीही नव्हता इतक्या तीव्रतेने ऐरणीवर आला आहे.

नॅशनल सँपल सर्व्हेच्या ताज्या माहितीनुसार, आजघडीस देशाची सुमारे एक चतुर्थांश लोकसंख्या, म्हणजे २२ ते २३ कोटी भारतीय नागरिक दरदिनी एक डॉलरहूनही कमी उत्पन्नावर गुजराण करीत आहेत. देशातील किमान पाच राज्यांचे निम्मे नागरिक आत्यंतिक दारिद्र्याने खितपत पडले असून, आपले १५ टक्के नागरिक वयाची चाळीशी गाठण्यापूर्वीच मृत्युला सामोरे जाण्याचा धोका आहे. दरम्यान, संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'चिल्ड्रेन्स फंड' च्या अधिकाऱ्यांनी मात्र पोलिओ निर्मुलन व प्राथमिक शाळांमधील भरती सारख्या काही सामाजिक मोहिमांत भारताने चांगली प्रगती केली असल्याचे प्रशस्तीपत्र दिले आहे. ही प्रशस्ती सुखावह असली तरी प्राथमिक आरोग्यसेवेसारख्या अन्य अनेक महत्वाच्या गोष्टीत आपण अद्यापही खूप मागासलेले आहोत. या क्षेत्रात पायाभूत सोयीसुविधांचे जाळे उभारण्यात आपण केलेली प्रगती तशी नगण्यच असून, त्याबाबतीतला आपला एकंदर दृष्टीकोन आता आमुलाग्रपणे बदलण्याची आवश्यकता आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'ह्युमन डेव्हलपमेंट रिपोर्ट' मधील भारताचे २००० ते २००७-०८ या दरम्यानचे 'रँकिंग' फारसे बदललेले नाही याचा अर्थ एकच होतो तो म्हणजे सर्वसामान्य भारतीयांच्या जीवनाचा स्तर आजही अजिबात उंचावलेला नाही ! सर्वदृष्ट्या साकळलेल्या म्हणाव्या अशा या दारूण स्थितीत मुख्यतः आपल्या सरकारची चुकीची धोरणेच जबाबदार आहेत. तात्पुरत्या उपाययोजना करून वेळ मारून नेण्यावरच या धोरणांचा भर असल्यामुळे पायाभूत सोयीसुविधांचे जाळे उभारण्यासाठी आवश्यक असलेले दीर्घकालीन गुंतवणुकीचे सातत्य आपण राखू शकलेलो नाही. यासंदर्भात प्रसूतीकाळातील

> **नव्या सहस्त्रकाची विकास उद्दिष्टे गाठायची तर आता आपल्याला देशांतर्गत आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासारख्या मुलभूत गोष्टींकडे प्राधान्याने लक्ष द्यावे लागणार आहे. त्यात आपण कमी पडलो तर सर्वंकष व सर्वांगिण प्रगती ही, या देशाला दूरच्या दिव्यासारखीच राहील...!**



मृत्युदराचे (मॅटर्नल मॉर्टेलिटी रेट) उदाहरणच घेऊ या ना ! सध्या दरवर्षी जगभरातील ५.३६ लाख महिला गर्भार अवस्थेत वा प्रसुतीच्या वेळी मृत्युमुखी पडतात. त्यात भारतीय महिला किती हे पाहू गेले तर १.१७ लाख हा आकडा डोळ्यांसमोर येतो. आपल्या एकूण देशांतर्गत उत्पादनाचा जेमतेम एक टक्का भाग आरोग्य रक्षणावर खर्च होत असल्यामुळेच हे घडत आहे. 'कमिशन ऑफ मॅक्रोइकॉनॉमिक्स अॅड हेल्थ' ने नागरिकांच्या आरोग्यरक्षणासाठी दरवर्षी, दरडोई किमान ३० ते ४० डॉलर खर्चण्याची शिफारस विकसनशील देशांना केली आहे.. परंतु आपल्याकडे हा खर्च फ़क्त ६.३९ डॉलर एवढाच होतो. चीनमध्ये हाच खर्च दरडोई २१.७ डॉलर तर श्रीलकेचा १५.५७ डॉलर एवढा होतो, हे लक्षात घेतले म्हणजे आरोग्यसेवांच्या बाबतीत आपण बाकी साऱ्या जगाच्या किती तरी मागे आहोत, हे वेगळे सांगण्याची गरज भासू नये. प्रसूतीकाळातील मृत्युदराच्या बाबतीतही हेच चित्र दिसते. मलेशिया, चीन व श्रीलंका या देशांमध्ये हा मृत्युदर दर लाखांत अनुक्रमे ४१, ५६ व ९२ असा अत्यल्प असतांना आपला मृत्युदर ५४० एवढा मोठा आहे, या तिन्ही आशियायी देशांतील महिलांना प्रसूतीच्या वेळी कुशल डॉक्टरांची मदत ९७ ते १०० टक्के मिळते पण भारतीय महिलांना फक्त ती ५० टक्के मिळू शकते. हे दुदैवी चित्र बदलण्यासाठी केंद्रातील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने 'जननी सुरक्षा योजना' आखली असून त्याअंतर्गत शासकीय रुग्णालयांमध्ये प्रसुत होणाऱ्या महिलांना काही आर्थिक पुरस्कार दिले जातात. अर्थात ही योजना स्वागतार्ह असली तरी देशातील बहुतेक सर्व स्थानिक आरोग्य केंद्रांमध्ये पुरेसा कर्मचारीवर्ग, आवश्यक ती औषधे आणि पर्याप्त निधी नसतो, त्याचे काय ? ही पायाभूत यंत्रणा योग्यप्रकारे उभारली जात नाही तोवर देशातील आरोग्य सेवेचा दर्जा सुधारणे सर्वथा अशक्य आहे. बुलेटिन ऑन रुरल हेल्थ स्टॅटिस्टिक्स इन इंडियांच्या माहितीनुसार, आजघडीस आपल्या देशात २०९०३ आरोग्य उपकेंद्रे - ४८०३ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि २६५३ सामाजिक आरोग्य केंद्रांची कमतरता आहे आपल्याकडे दर सहा हजार नागरिकांमागे फक्त एक





बिछाना उपलब्ध होत असून किमान एक तृतीयांश गर्भवती महिलांना टिटनस प्रतिबंधक लशीचा लाभ मिळत नाही. ही लस सर्वांना उपलब्ध झाली तर प्रसूतीच्यावेळी बाळ बाळंतिणीस काही अन्य जीव-जंतुंची, विषाणूंची लागण होणे, सहजी टळू शकेल.

महिलांच्या आरोग्याची हेळसांड आपल्याकडे त्यांच्या बालपणापासूनच होते, साहजिकच कमी वजनाच्या व 'ॲनिमिक' स्थितीतील या महिलांच्या जीवास प्रसूतीच्यावेळी सर्वाधिक धोका संभवतो. सध्या सरकारी रूग्णालयात प्रसूत झाल्यास त्यांना काही आर्थिक मदत जरूर मिळते, परंतु त्या पैशाचा उपयोग स्वतःचे व बाळाचे आरोग्य सुधारण्यासाठी कसा करावा, याचे मार्गदर्शन मात्र केले जात नाही. खरे तर ही सर्व परिस्थिती म्हणजे मानवी हक्कांची पायमल्ली असून, संयुक्त राष्ट्रसंघाचे प्रा. पॉल हंट यांनी तर त्याचे वर्णन ''ए ह्युमन राइटस् कॅटास्ट्रोफी' अशाच शब्दात केले आहे.

हे चित्र बदलण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले अगदी तातडीने उचलण्याची वेळ आता निश्चितपणे आली आहे. दारिद्र्यनिर्मुलनाच्या सर्वंकष व टिकावू योजना आखून त्यांची चोख अंमलबजावणी करण्यासच यापुढे सर्वाधिक प्राधान्य दिले गेले पाहिजे. युपीए सरकारची राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना त्या दृष्टीनेच तयार केली गेली आहे. अशा योजनांमुळे आपला राष्ट्रीय प्रश्नांकडे बघण्याचा दृष्टिकोन तर सुधारेलच पण एकूण कारभारास सर्वजन सहभाग व पारदर्शी प्रामाणिकपणाचे परिमाणही जरूर प्राप्त होईल. विकास व प्रगतीची प्रक्रिया गतिमान करणे म्हणजे दानधर्म करणे नव्हे वा सवलत योजनांची खैरात करणे नव्हे तर मूलभूत मानवी हक्कांची पूर्तता करणे होय, हे आता आपण सर्वांनीच समजून घेतले पाहिजे. अर्थात त्याचे प्रतिबिंब प्रामुख्याने राष्ट्रीय नियोजन, धोरण व अंमलबजावणीत पडणे जरुरीचे आहे. नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर सत्तेवर पुन्हा आलेले युपीए सरकार आणि सर्व राजकीय पक्षांनी आता आपल्या धोरणे व कार्यक्रमांत आरोग्य-शिक्षण- महिलांचे सबलीकरण आणि नागरिकांची रोजगार क्षमता वाढविणे या मुद्द्यांनाच सर्वाधिक महत्त्वाचे स्थान देणे गरजेचे आहे. तसे झाले तरच या देशाची सर्वांगीण प्रगती होऊ शकेल. (चेन्नईच्या 'हिंदू'वरून साभार).

■■■

**मागोवा क्रिडाविश्वाचा**

# अखेर फेडररने गाठले यशाचे सर्वोच्च शिखर !







## 'ॲशेस' मध्ये इंग्लंडची आघाडी तर बांगलाने फेकले विंडीजला पिछाडी

**- मुकुंद मोघे**

टेनिसचा अनभिषिक्त सम्राट रॉजर फेडररने 'विंबल्डन' मध्ये घडविलेला नवा इतिहास ऑस्ट्रेलिया व इंग्लंड या पारंपारिक प्रतिस्पर्धी संघाच्या 'अॅशेस' मालिकेस इंग्लंडमध्ये झालेला प्रारंभ व दुसरी कसोटी जिंकून इंग्लंडने त्यात मिळविलेली आघाडी आणि 'स्टार' क्रिकेटपटूंच्या बंडखोरीमुळे दुर्बल बांगला देश संघाविरूद्धची कसोटी मालिका गमावण्याची वेस्ट इंडिजवर ओढवलेली नामुष्की ही सरत्या जुलै महिन्यातील क्रीडाविषयक घडामोडींची मुख्य वैशिष्ट्ये ठरली.

गेल्या महिन्यात 'फ्रेंच ओपन' जिंकून रॉजर फेडररने अमेरिकेच्या पीट सॅम्प्रासच्या सर्वाधिक चौदा ग्रॅण्ड स्लॅम विजयांची बरोबरी केली होती. या महिन्यात आपल्या 'विंबल्डन' विजेतेपदांची संख्या अर्ध्या डझनावर नेऊन त्याने विक्रमी पंधरावे 'ग्रण्ड स्लॅम' विजेतेपद पटकावले आणि आंतरराष्ट्रीय टेनिसच्या इतिहासात एका नव्या सोनेरी पानाची अमूल्य भर टाकली. 'फ्रेंच ओपन' प्रमाणे याही स्पर्धेत त्याला आपला कट्टर प्रतिस्पर्धी रॅफेल नदालच्या अनुपस्थितीचा काहीसा लाभ जरूर मिळाला, परंतु त्यामुळे त्याच्या विक्रमी कामगिरीचे महत्व मात्र अजिबात कमी होत नाही. यावर्षी 'विंबल्डन' मध्ये नदाल उतरला नसला तरी अँडी रॉडिक, टॉमी हास, लिटन हेविट, जोकोविक आणि अँडी मरे या जगभरातील सर्वोत्तम टेनिसपटूंचे कडवे आव्हान फेडररपुढे होतेच. त्यापैकी टॉम हासला त्याने उपांत्य फेरीत सरळ तीन सेटस्मध्ये अगदी सहजी नमविले परंतु अंतिम फेरीत मात्र त्याला अँडी रॉडिकने चांगलेच दमविले. ब्रिटनचा 'उगवता तारा' अँडी मरे हा यंदा 'विंबल्डन'च्या उपांत्य फेरीपर्यंत धडक मारणारा पहिला ब्रिटीश टेनिसपटू ठरला. तेथे त्याचे कडवे



रॉडिक

आव्हान मोडून काढत अंतिम फेरीत दाखल झालेला रॉडिक यावेळी खरोखरच जबरदस्त 'फॉर्म' मध्ये होता. अंतिम लढतीत त्याच्या झंझावाती सर्व्हिसपुढे फेडररची मात्रा अजिबात चालली नाही परंतु साडेचार तासांच्या प्रदीर्घ व रोमांचकारी खेळानंतर अखेर त्यानेच बाजी मारली आणि आपण 'ऑल टाइम ग्रेट' आहोत, हे निर्विवादपणे सिद्ध करून दिले. विशेष म्हणजे 'विंबल्डन'च्या सेंटर कोर्टवर हा इतिहास घडला तो पीट सॅम्प्रस, ब्योर्न बोर्ग, मॅन्युअल सँताना आणि टेनिसचे बँडमन समजले जाणारे रॉड लेवर या दिग्गजांच्या साक्षीने ! त्यांच्या दिलखुलास प्रशस्तीचा सविनय व सादर स्विकार करीत असतांना फेडररने उपविजेता रॉडिकच्या झुंझार खेळाची आवर्जून

**टेनिसचा अनभिषिक्त सम्राट रॉजर फेडररने 'विंबल्डन' मध्ये घडविलेला नवा इतिहास ऑस्ट्रेलिया व इंग्डंड या पारंपारिक प्रतिस्पर्धी संघाच्या 'अॅशेस' मालिकेस इंग्लंडमध्ये झालेला प्रारंभ व दुसरी कसोटी जिंकून इंग्लंडने त्यात मिळविलेली आघाडी आणि 'स्टार' क्रिकेटपटूंच्या बंडखोरीमुळे दुर्बल बांगला देश संघाविरूद्धची कसोटी मालिका गमावण्याची वेस्ट इंडिजवर ओढवलेली नामुष्की ही सरत्या जुलै महिन्यातील क्रीडाविषयक घडामोडींची मुख्य वैशिष्ट्ये ठरली.**

तारीफ  केली आणि आपण केवळ सर्वोत्तम टेनिसपटू नाही तर दिलदार सद्‌गृहस्थही आहोत, याचा मनोहारी प्रत्यय जगभरच्या क्रीडाशौकिनांना दिला. 'फायटींग स्पिरीट' आणि 'किलर इन्स्टिंक्ट' हो दोन शब्द सध्या जीवनाच्या अन्य सर्व क्षेत्रांप्रमाणे क्रीडाविश्वातही परवलीचे बनले आहेत. परंतु त्यांच्या सहाय्याने आपल्या कारकिर्दीचा आलेख उंचावत असतांना सभ्यता-सौजन्य आणि खिलाडूपणा हे गुणही टिकवून ठेवता येतात व खरे तर त्याआधारेच नेणत्यांप्रमाणे जाणत्यांचीही मने जिंकता येतात, हे फेडररने स्वतःच्या उदाहरणानेच सिद्ध करून दिले आहे... आणि खरे तर त्यातच सारे मोठेपण दडलेले आहे.

पुरुष गटात फेडरर हा पराक्रम गाजवित असतांना महिला गटानं संपूर्ण वर्चस्व राहिले ते बलदंड सेरेना व व्हीनस या विल्यम्स भगिनींचेच! पिळदार शरीरयष्टी आणि धिप्पाड बांध्यांच्या या भगिनींपुढे ॲना इवानोविक - एलिना डिमेंटेवा - मारिया शारापोवा आणि जागतिक क्रमवारीत अव्वलस्थानी असलेली साफिना या साऱ्याजणींनी अक्षरशः सपशेल नांगी टाकली. अखेर अंतिम लढत सेरेना व व्हीनस यांच्यातच झाली आणि त्यात सेरेनाने बाजी मारली. तिचे हे तिसरे विंबल्डन जेतेपद असून आता 'ग्रॅण्ड स्लॅम' ची एकूण अकरा विजेतीपदे तिच्या नावावर जमा झाली आहेत.

यंदा सेरेना जिंकल्यामुळे व्हीनसला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले आणि तिची विंबल्डन विजेतेपदांची हॅटट्रीकही हुकली. परंतु महिला दुहेरीचे विजेतेपद सेरेनाच्या साथीत पटकावून तिने स्पर्धेचा शेवट गोड केला

फ्रेंच ओपन प्रमाणे विंबल्डन मध्येही भारताच्या सानिया मार्झाचे आव्हान पहिल्या-दुसऱ्या फेरीतच संपुष्टात आले आणि महेश भूपती व लिएँडर पेस या अनुभवी खेळाडूंच्या हातीही फारसे काही लागले नाही. गेली कित्येक वर्षे हे दोघे दुहेरीचे सामने खेळत आपले अस्तित्व टिकवून असले तरी क्रीडामंत्री गिल म्हणतात त्याप्रमाणे त्याला खरोखरच फारसा अर्थ नाही. आता सानियाही विवाहबद्ध होण्याच्या मार्गावर असल्याने भारतीय टेनिसचे भवितव्य तसे निराशाजनकच दिसते. असो.



## ‘अॅशेस लढतींना प्रारंभ

लंडनमध्ये एकीकडे ‘विंबल्डन स्पर्धा’ रंगलेली असतांना दुसरीकडे कार्डिफच्या मैदानावर इंग्लंड-ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघाच्या अॅशेस मालिकेस प्रारंभ झाला. या सलामीच्या लढतीत पहिल्या डावात ४३५ धावांची मजल मारून इंग्लंडने सुरूवात तर जोरदार केली, परंतु नंतर ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॉंटिंग (१५), सलामीवीर कॅटिच (१२२), यष्टीरक्षक हॅडिन (११५) व नवोदित नॉर्थ (१२२) यांनी तुफानी शतके झळकावून आपल्या संघास ५ बाद ६७२ अशी मजबूत स्थिती प्राप्त करून दिली.



पहिल्या डावात २३७ धावांनी मागे पडलेल्या इंग्लंडचा दुसरा डाव एक वेळ ८ बाद १७० असा घसरला होता पण अॅडरसन-पानेसर-स्वान या तळाच्या फलंदाजांनी चिवट खेळ केला आणि सामना अनिर्णित राखण्यात यश मिळविले. अर्थात पंचांची सदोष कामगिरी आणि पाऊस व खराब हवामानामुळे सुमारे पन्नास षटकांचा वाया गेलेला वेळ हे नाकारून चालणार नाही.

पहिल्या कसोटीतील या दारूण निराशेचा वचपा पॉन्टिंग व त्याचे सहकारी ‘लॉडस्’वर झालेल्या दुसऱ्या कसोटीत काढतील, अशी अपेक्षा होती. पण तेथे उलटेच घडले आणि तब्बल ७५ वर्षांनंतर प्रथमच या मैदानावर ऑस्ट्रेलियाचा पराभव झाला. यावेळीही इंग्लंडच्या विजयांत पंचांच्या सदोष कामगिरीचा मोठा भाग राहिलाच. परंतु खुद्द कर्णधार अॅण्ड्र्यू स्ट्रासची १६१ धावांची मोठी खेळी, त्याला कुक, कॉलिगवुड व प्रायर यांच्या अर्धशतकांची मिळालेली जोड आणि मुख्य म्हणजे अष्टपैलू फ्लिटॉफ, अँडरसन व स्वान या तिघांची अचूक गोलंदाजी यामुळे सर्व पाच दिवसांच्या खेळावर इंग्लंडचेच वर्चस्व राहिले. या सामन्याच्या दुसऱ्या डावात मायकेल क्लार्क (१३६) व हॅडिन (८०) यांनी केलेले आकर्षक फलंदाजी वगळता अन्य एकाही ऑस्ट्रेलियन खेळाडूकडून चमकदार म्हणावी अशी कामगिरी झाली नाही आणि आता तो संघ मालिकेत १-० असा पिछाडीवर पडला आहे. अर्थात आणखी तीन कसोटी बाकी असल्याने ‘अॅशेस’वर कब्जा कोणाचा होणार, याबद्दल आत्ताच काही भाकित करणे चुकीचे ठरेल. आत्तापर्यंतचा खेळ तरी ‘तुल्यबळांची लढत’ असाच काहीसा झाला आहे, हे निश्चित.

## बांगला देशने हरविले विंडीजला

आंतरराष्ट्रीय क्रमवारीत सर्वात शेवटच्या स्थानावर असलेला बांगला देशचा क्रिकेट संघ सध्या वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर आहे. हा संघ पहिल्या कसोटीसाठी सज्ज झाला परंतु अगदी अखेरच्या क्षणी यजमान संघाच्या कर्णधार गेलसह सर्व प्रमुख खेळाडूंनी बंडाचे निशाण फडकविले आणि ‘स्पॉन्सरशिप मनी’त योग्य वाटा मिळण्यासह अन्य सर्व प्रलंबित मागण्या



मान्य होत नाहीत तोवर खेळण्यास नकार दिला. खरे तर, त्यांच्याशी योग्य ती तडजोड करून वेस्ट इंडिज क्रिकेट नियामक मंडळाने हा वाद मिटविणे जरूरीचे होते, पण त्याऐवजी स्थानिक प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये खेळणारे कुठलेतरी नवे-जुने खेळाडू गोळा करून त्यांनी दोन कसोटी सामने कसेबसे पार पाडले. अर्थात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दशकभराहून अधिक काळ वावरूनही आजवर फक्त झिंबाब्वे विरूद्ध एकुलता एक कसोटी सामना जिंकू शकलेल्या बांगलादेशी खेळाडूंच्या दृष्टीने ही सुवर्णसंधी होती.. आणि दोन्ही कसोटी सामन्यात वेस्ट इंडिजच्या दुय्यम श्रेणी संघास नमवून त्यांनी ती वाया जाऊ दिली नाही. ही मालिका जिंकल्यामुळे त्यांच्या प्रतिष्ठेत थोडी भर पडली असली तरी वेस्ट इंडिज क्रिकेट नियामक मंडळ मात्र चांगलेच अडचणीत आले आहे. गेल-सारवान-ब्राव्हो सारख्या बेभरवशी पण जबरदस्त खेळाडूंना आता चुचकारले नाही तर आपल्या देशाचे केवळ क्रिकेट नव्हे तर ऐक्यच धोक्यात येईल अशी चिन्हे दिसू लागल्यावर या मंडळाने नुकताच राष्ट्रकुलाचे माजी सरचिटणीस सिद्धार्थ रामफल यांचा लवाद नेमला आहे. या लवादाकडून खेळाडूंच्या न्याय्य मागण्यांची दखल घेतली जाईल, अशी अपेक्षा आहे, पण ती फलद्रुप झाली नाही तर मात्र वेस्ट इंडिजप्रमाणे आंतरराष्ट्रीय क्रिकेटचेही फार मोठे नुकसान होईल हे निश्चित.

## श्रीलंकेची पाकवर मात

ट्वेंटी ट्वेंचीचा विश्वकरंडक जिंकून युनिस खानच्या पाकिस्तान संघाने गेल्या महिन्यात मोठा पराक्रम गाजविला खरा, परंतु श्रीलंकेच्या ताज्या दौऱ्यात मात्र त्याला तीनपैकी पहिले दोन कसोटी सामने अगदी अनपेक्षितीरत्या फार मोठ्या फरकाने गमवावे लागले. खरे तर, महंमद युसुफसारख्या दर्जेदार-हुकुमी फलंदाजाच्या पुनरागमनामुळे पाकचा संघ श्रीलंकेच्या तुलनेत कागदावर तरी अधिक बलवान वाटत होता... पण प्रत्यक्ष मैदानावर एखाद-दुसरा अपवाद वगळता या संघातील सर्वच खेळाडूंनी अतिशय अवसान घातकी व बेजबाबदार खेळ केला आणि अक्षरशः संभाव्य विजयांचे दारूण पराभवांत रूपांतर केले. गॅले येथील पहिल्या कसोटीत श्रीलंकेचा डाव २९२ धावांत गुंडाळल्यावर महंमद युसूफचे शतक व मिसबा उल हक चे अर्धशतक यांच्या बळावर पाकने ३४२ धावांची मजल मारली. पन्नास धावांचे हे महत्वपूर्ण आधिक्य कमी म्हणून की काय, नंतर श्रीलंकेचा दुसरा डाव २१७ धावांतच रोखला गेला आणि पाकपुढे विजयासाठी फक्त १६८ धावा करण्याचे माफक आव्हान राहिले. ते पेलतांना त्या संघाने १ बाद ८० ची मजल



मारली खरी पण नंतर मात्र हेराथ व तुषाराच्या माऱ्यापुढे त्याची अशी काही घसरगुंडी उडाली की बस्स ! पाकचा दुसरा डाव फक्त ११७ धावांत उखडला गेला आणि तो संघ चक्क पन्नास धावांनी पराभूत झाला. या लाजिरवाण्या पराभवाचे समर्थन करतांना कर्णधार युनिस खानने 'आपले खेळाडू' सुमारे दीड वर्षांनंतर प्रथमच कसोटी सामना खेळत असल्याची हास्यास्पद सबब पुढे केली आणि स्वतःचे अधिकच हसे करून घेतले. तो असा हास्यास्पद ठरत असतांना श्रीलंका संघाचा नवा कर्णधार कुमार संगाकारा मात्र समयोजित खेळ व उत्तम व्यूहरचना याबद्दल सर्वांच्याच प्रशंसेचा धनी ठरला.

आपली ही प्रशंसा अनाठायी नाही, हे संगाकारा व त्याच्या गुणी सहकाऱ्यांनी कोलंबोतील दुसऱ्या कसोटीतही सिद्ध केले. तेथे पाकचा पहिला डाव फक्त ९० धावांत उखडला गेला. निचांकी म्हणाव्या अशा या धावसंख्येत माजी कर्णधार शोएब मालेकच्या नाबाद ३९ धावांचा समावेश होता. श्रीलंकेच्या कुलशेखरा, हेराथ, मेंडिस व तुषारा या अनेकदृष्ट्या अननुभवी व नवोदित म्हणाव्या अशा गोलंदाज चौकडीने हीच कमाल पाकच्या दुसऱ्या डावातही करून दाखविली आणि त्या संघाची अवस्था १ बाद २८० वरून सर्वबाद ३२० अशी केली. अखेर हा सामना श्रीलंकेने ७ गडी राखून जिंकला आणि मायभूमीत प्रथमच पाकविरूद्धची कसोटी मालिका जिंकण्याचे श्रेय मिळविले. मुरलीधरन्, जयसूर्या व चामिंडा वास ही अनुभवी त्रिमूर्ती संघात नसतांना संगाकाराने ही जी कामगिरी बजावली आहे त्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच ठरेल. दरम्यान वैयक्तिक सात हजार कसोटी धावांचा टप्पा पार करून आणि तिसऱ्या अनिर्णीत कसोटीत नाबाद शतक झळकावून त्याने आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुराही खोवला आहे.

श्रीलंका-पाकिस्तान-वेस्ट इंडिज-बांगलादेश आणि इंग्लंड व ऑस्ट्रेलियाचे क्रिकेटपटू कसोटी मालिका खेळण्यात मग्न असतांना सध्या आपले खेळाडू मात्र छान विश्रांती घेत आहेत. ट्वेंटी ट्वेंटीचे जगज्जेतेपद गमावल्यामुळे मध्यंतरी धोनी व त्याचे सहकारी क्रिकेट शौकिनांच्या टीकेचा विषय ठरले होते, परंतु नंतर वेस्ट इंडिजविरूद्धची एकदिवसीय सामन्यांची मालिका २-१ अशी निसटत्या फरकाने का होईना पण जिंकून त्यांनी आपला दबदबा पुन्हा प्रस्थापित केला आहे. या दबदब्याची गोडी वाढावी म्हणून की काय, आपल्या गौतम गंभीरने नुकतेच कसोटीपटूंच्या जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले आहे. गेल्या वर्षभरातील ११ कसोटींत ७५ च्या सरासरीने १५७९ धावा पटकावणारा हा सलामीवीर आता लौकरच अर्जुन पुरस्कारांचाही मानकरी ठरणार असल्याचे वृत्त आहे.

## सुशीलकुमारचे 'ग्रँड कम बॅक'



भारताचा अव्वल कुस्तीगीर सुशीलकुमारने नुकतेच 'जर्मन ग्रँड प्रिक्स' मध्ये सुवर्णपदक पटकावले आणि आंतरराष्ट्रीय कुस्तीक्षेत्रात 'ग्रँड कम बॅक' केले. मध्यंतरी पट्टाया येथे झालेल्या आशियायी स्पर्धेत तो 'ओव्हर वेट'मुळे बाद झाला होता आणि नंतर अमेरिकेतील एका स्पर्धेतून ऐनवेळी माघार घेऊन त्याने रेसलिंग फेडरेशन ऑफ इंडियाची गैरमर्जी ओढवून घेतली होती. आता जर्मनीतील सुयशामुळे तो पुन्हा एकदा प्रकाश झोतात येईल, अशी अपेक्षा आहे.

## महिला हॉकी संघाचे सुयश

भारताचा राष्ट्रीय खेळ असलेल्या हॉकीत पुरुष संघाची कामगिरी सुधारत असताना महिला संघानेही रशियात झालेली चॅम्पियन चॅलेंज ट्रॉफी स्पर्धा जिंकली आहे. परंतु विशेष म्हणजे हा अभिमानास्पद विजय मिळवून तो संघ मायदेशी परतला तेव्हा त्याच्या स्वागतासाठी विमानतळावर भारतीय हॉकी महासंघाचे पदाधिकारीही उपस्थित नव्हते. त्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करताना संघाचे मार्गदर्शक एम. के. कौशिक यांनी क्रिकेटवेड्यांच्या या देशात हॉकीला विचारतो कोण? असा जो प्रश्न विचारला. तो खूप काही सांगून जाणारा आहे. क्रिकेटवर प्रेम जरूर करा पण जगात अन्यही बरेच खेळ आहेत या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करू नका. हे आपल्या क्रीडाप्रेमी म्हणविणाऱ्या देशवासियांच्या लक्षात तरी कधी येणार?

## देवधर करंडकाचा वाद

नुकतेच देवधर करंडक क्रिकेट स्पर्धा रद्द करण्यावरून निर्माण झालेले आमच्या मुजोर क्रीडापदाधिकाऱ्यांचे अज्ञान व बेफिकीरीवर झगझगीत प्रकाश टाकून गेले. देशांतर्गत क्रिकेटच्या वार्षिक कार्यक्रमातील अतिशय महत्त्वपूर्ण मानली जाणारी ही

स्पर्धा आयपीएलच्या सोयीसाठी रद्दच करण्याचे धक्कादायक पाऊल मध्यंतरी भारतीय क्रिकेट मंडळाने उचलले. सध्या संपूर्ण वर्षभर व्यावसायकि क्रिकेट खेळणाऱ्या आपल्या खेळाडूंना ही स्पर्धा रद्द केल्यामुळे थोडी तरी विश्रांती मिळेल. असा काही तरी निर्बुद्ध हिशेब या आततायी निर्णयामागे होता. परंतु त्यामुळे भारतीय क्रिक्रेटचे भीष्माचार्य मानले जाणारे प्रा. दि. ब. देवधर यांच्या स्मृतीची उपेक्षा होते आणि नवोदित युवा खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची मोठी संधी नाकारली जाते, याचाच या निर्णयकर्त्यांना विसर पडला होता. अखेर त्यांना ताळ्यावर आणण्यासाठी शिवसेनेतर्फे आंदोलनाचा इशारा दिला गेला आणि मग मात्र देवधर करंडक स्पर्धा रद्दबातल करण्याचा विचार आपण कधीच केलेला नाही, असा शहाजोग खुलासा करून संबंधितांनी या प्रकरणावर पडदा टाकला.

## वॉन-फ्लिंटॉफ-वासची निवृत्ती

इंग्लिश क्रिकेट संघाचा सर्वात यशस्वी कर्णधार मायकेल वॉन याने प्रथम श्रेणी क्रिकेटमधून तर इंग्लंडचाच अष्टपैलू खेळाडू ॲण्ड्यू फ्लिन्टॉफ व श्रीलंकेचा जलदगती गोलंदाज चामिंडा वास यांनी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. आंततराष्ट्रीय क्रिकेटमध्ये गेले सुमारे दीड दशक वावरलेले हे तिन्ही बडे खेळाडू आपापल्या संघांचे मोठे आधारस्तंभ होते. आता वाढते वय व शारीरिक दुखापतींमुळे त्यांचा प्रत्यक्ष खेळातील सहभाग, थांबणार वा कमी होणार असला तरी नव्या खेळाडूंना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी मात्र ते निश्चितच पार पाडत राहणार आहेत.




## फेडररचा डबल बोनान्झा

ऐन पंचविशीत आंतरराष्ट्रीय टेनिसच्या सर्वोच्च शिखरावर विराजमान झालेला स्वित्झर्लंडचा रॉजर फेडरर नुकताच दोन मुलींचा प्राऊड पप्पा बनला आहे. यंदा फ्रेंच ओपन पाठोपाठ विंबल्डनही जिंकून फेडररने दोन ग्रॅण्ड स्लॅम अजिंक्यपदे पटकावली आणि आता जुळ्या मुलींचे पितृपद मिळवून त्याने जणू काही हे वर्ष आपल्यांसाठी डबल बोनान्झा इयर असल्याचेच सिद्ध करून दिले आहे. आजवर हा महान खेळाडू नेहमीच जागतिक



टेनिस स्पर्धांचे झळाळते करंडक मिरविताना डोक्यावर घेताना आपण पाहिला. पण यापुढे मात्र त्या करंडकांच्या बरोबरीने नव्या दोन चिमुकल्या चिमण्यांना सांभाळण्याची कसरत करतांनाही तो आपल्याला दिसेल. अर्थात त्याचे हे 'रुप' ही मोठे मनोहर असेल हे निश्चित!

## गोल्फपटू भुल्लरचे सुयश

इंडोनेशिया प्रेसिडेंट इन्व्हिटेशन स्पर्धा जिंकून भारताचा युवा गोल्फपटू गगनजित भुल्लरने नवा विक्रम केला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर अशी कामगिरी करून दाखविणारा तो सर्वात अल्पवयीन भारतीय ठरला आहे. वयाच्या २१ व्या वर्षीच व्यावसायकि गटाचे पहिले विजेतेपद मिळविण्याची कामगिरी आता त्याच्या नावापुढे जमा झाली आहे. त्याच्यापूर्वी जीव मिल्खासिंग व शिवकपूर या अन्य दोन गोल्फ पटूंनी अशी कामगिरी बजावली. परंतु त्यावेळी ते दोघेही भुल्लरपेक्षा दोन वर्षांनी मोठे म्हणजे तेवीस वर्षांचे होते. या विजयामुळे भुल्लरला तब्बल साडेतीन लाख रुपयांची भरघोस बक्षीस रक्कम मिळाली.

■■■